सुविचार
पहाड जैसी विपत्ति को दूर करने के लिए
सिर्फ थोडा सा साहस ही पर्याप्त है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ रविवार दि. ९ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## नरेंद्र मोदी घेणार सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ

नवी दिल्ली : नरेंद्र मोदी यांचा पंतप्रधान म्हणून सलग तिसऱ्यांदा शपथविधी सोहळा रविवार, ९ जून रोजी राष्ट्रपती भवनात पार पडणार आहे. या पार्श्र्वभूमीवर दिल्लीतील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. या शपथविधी सोहळ्याला विविध क्षेत्रातील दिग्गज व मनोरंजन विश्र्वातील कलाकारांसह आठ हजारांहून अधिक पाहुणे उपस्थित राहणार आहेत. शुक्रवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भाजप संसदीय पक्षाच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) घटक पक्षांनी पाठिंब्याचे पत्र सादर केले. त्यानंतर मोदी यांची पंतप्रधानपदी नियुक्ती केली. देशातील अन्य राजकीय पक्षांचे नेतेही उपस्थित राहण्याची शक्यता आहे. एकूण ८००० हजार लोक सोहळ्याला उपस्थित राहाणार असल्याचे सांगितले जात आहे. रविवारी संध्याकाळी ७वाजून १५ मिनिटांनी मोदी यांचा शपथविधी सोहळा होणार आहे.



त्यातच मंत्रिमंडळात समाविष्ट केल्या जाणाऱ्या नेत्यांची संभाव्य यादी समोर आली आहे. त्यानुसार, यात काही माजी मंत्री आणि नव्या चेहऱ्यांचाही समावेश आहे. घटक पक्षातील टीडीपी, जेडीयू, आरएलडी, शिवसेना, राष्ट्रवादी, अपना दल, एलजेपी पक्षातील नेत्यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालात यंदा भाजपाला स्पष्ट बहुमत मिळालं नाही. त्यामुळे घटक पक्षांना सोबत घेत भाजपाला सरकार चालवावे लागणार आहे. एनडीएत कोणाला कोणती खाती देणार याबाबत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या घरी बैठकही पार पडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नव्या मंत्रिमंडळात भाजपाकडून राजनाथ सिंह, अमित शहा, जे.पी. नड्डा, नितीन गडकरी, एस जयशंकर, महेश शर्मा, एसपी सिंह बघेल, अनुराग ठाकूर, पीयूष गोयल, मनसुख मांडविया, नित्यानंद राय, अर्जुनराम मेघवाल, गजेंद्र सिंह शेखावत, राजीव प्रताप रुडी, शिवराज सिंह चौहान यांची नावे आघाडीवर आहेत. त्याशिवाय ज्योतिरादित्य शिंदे, वीरेंद्र कुमार खटीक, मनोहर लाल खट्टर, भूपेंद्र यादव, सुरेश गोपी, विप्लब देब, सर्वानंद सोनेवाल, प्रल्हाद जोशी, शोभा करंदजले, पीसी मोहन, नारायण राणे, श्रीपाद नाईक यांचाही मंत्रिमंडळात समावेश केला जाण्याची शक्यता आहे.

घटक पक्षातील या नेत्यांना संधी (पान ७ वर)

## एक्झिट पोल वाले संकटात
### सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी शेअर बाजारावर कथित प्रभाव पाडण्यासाठी अंतिम टप्प्यातील मतदानानंतर लगेचच एक्झिट पोल प्रकाशित केल्याबद्दल मीडिया हाऊस आणि त्यांच्या सहयोगींच्या विरोधात चौकशीची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

निकालाच्या दिवशी शेअर बाजार कोसळला. हे फुगवलेल्या एक्झिट पोलमुळे झाले, त्यामुळे किरकोळ गुंतवणूकदारांचे ३१ लाख कोटी रुपयांचे नुकसान



झाल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेत म्हटले आहे की, १ जून रोजी निवडणुकीचा अंतिम टप्पा संपल्यानंतर लगेचच मीडिया हाऊसेसने एक्झिट पोल प्रकाशित करत त्यावर चर्चा करण्यास सुरुवात केली. त्यांनी ३ जून (सोमवार) रोजी शेअर मार्केट उघडेपर्यंत सामान्य गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शेअर बाजारात अनपेक्षित वाढ झाली.

याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, एक्झिट पोलमध्ये दाखवलेल्या आकड्यांप्रमाणे आकडे येतील या अपेक्षेने शेअर बाजार वाढला, पण प्रत्यक्षात निकाल वेगळा लागल्याने तो कोसळला. याचिका दाखल करणारे वकील बीएल जैन यांनी सांगितले की, ४ जून रोजी मतमोजणी झाली आणि शेअर बाजार (पान ७ वर)

## लोकसभेच्या परीक्षेत ६ डॉक्टर पास

मुंबई : लोकसभेच्या निवडणुकीत विविध पक्षांकडून डॉक्टरची पदवी असलेले तब्बल १२ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. त्यातील व्यवसायाने डॉक्टर असलेले ६ उमेदवार विजयी झाले असून ६ उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला आहे.

राज्यातील नवनिर्वाचित ४८ खासदारांमध्ये डॉक्टर खासदारांचा बोलबाला राहिला आहे. विजयी झालेल्या सहा खासदारांमध्ये डॉ. शोभा बच्छाव (धुळे), डॉ. प्रशांत पडोळे (भंडारा-गोंदिया), डॉ. कल्याण काळे (जालना) व शिवाजी काळगे ( लातूर) हे चार खासदार काँग्रेसचे आहेत. डॉ. श्रीकांत शिंदे (कल्याण) हे शिवसेनेचे तर डॉ. हेमंत सावरा (पालघर) हे भाजपचे आहेत. तसेच लोकसभा निवडणुकीत उमेदवारी मिळालेल्या डॉक्टर उमेदवारांपैकी डॉ. हीना गावित, डॉ. सुभाष भामरे, डॉ. अभय पाटील, डॉ. मोहन राईकवार, डॉ. भारती पवार, डॉ. सुजय विखे-पाटील या सहा डॉक्टरांच्या पदरात पराभव पडला आहे.

तसेच आडनाव साधर्म्य असलेले खासदार मात्र वेगवेगळ्या विरोधी पक्षांतील आहेत. यात प्रतापराव जाधव (बुलडाणा-शिवसेना, शिंदे), संजय जाधव ( परभणी - शिवसेना, उबाठा), अमर काळे (वर्धा- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार), कल्याण काळे (जालना - काँग्रेस), श्रीकांत शिंदे ( कल्याण - शिवसेना, शिंदे), प्रणिती शिंदे ( सोलापूर - काँग्रेस), संजय दीना पाटील (ईशान्य मुंबई - शिवसेना, उबाठा), विशाल (पान ७ वर)

## मी पळणारा नाही तर लढणारा व्यक्ती

मुंबई : राज्यात महायुतीला आलेल्या अपयशाची सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर घेत देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधून मला मोकळं करावं, अशी विनंती पक्षश्रेष्ठींकडे केली होती. याबाबत त्यांनी निकालाच्या दुसर्याच दिवशी पत्रकार परिषद घेत माहिती दिली. त्यांच्या उपमुख्यमंत्री व गृहमंत्रीपदाच्या राजीनाम्याच्या मागणीला अमित शाह यांनी मात्र स्पष्ट नकार दिल्याचे व त्यांना काम सुरु ठेवण्याचा सल्ला दिल्याचे माध्यमांतून समोर आले. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः माध्यमांशी संवाद साधत नेमकं काय घडलं हे सांगितलं आहे. मुंबईत भाजपची बैठक पार पडली, यावेळी त्यांनी माध्यमांसमोर आपली भूमिका स्पष्ट केली.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकसभा निवडणुकीत राजकीय गणितात आपण कमी पडलो. मी मोकळं करा, हे निराशेतून बोललो नाही. देवेंद्र फडणवीस हा पळणारा व्यक्ती नाही. लढणारा व्यक्ती आहे. चारी बाजूंनी घेरल्यानंतर पुरंदरचा तह करणारे आणि पुन्हा ताकदीने सर्व किल्ले जिंकणारे शिवराय आमची प्रेरणा आहेत. कोणाला वाटलं असेल की मी निराश झालो किंवा भावनेच्या भरात बोललो, तर ते सत्य नाही. माझ्या डोक्यात स्ट्रॅटेजी होती. मी अमित शाह यांना भेटून आलो, त्यांना काय डोक्यात आहे ते सांगितलं. त्यांनी मला सांगितलं आपण महाराष्ट्राची ब्लू प्रिंट तयार करु. मी एक मिनीट देखील शांत बसलो नव्हतो आणि बसणार नाही आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

नेहरुंनंतर तिसर्यांदा पंतप्रधान बनण्याचा विक्रम मोदींचा

देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशाच्या इतिहासामध्ये सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याचे रेकॉर्ड यापूर्वी केवळ नेहरुंच्या नावावर आहे. त्यांची बरोबरी आता नरेंद्र मोदी यांनी केली आहे. लोकांनी मोदीजी आणि एनडीएवर पुन्हा एकदा विश्र्वास दाखवला. आपल्याला रणनिती ठरवण्यासाठी आजची बैठक महत्वाची आहे. महायुतीचं सरकार पुन्हा कसं आणता येईल, यासाठी प्रयत्न करुयात, असं आवाहन फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केलं.

पाऊस पडताना जे पेरलं जातं ते उगवतं

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, जसा आनंद आहे, तशीच मनात सल आहे. २०१४ आणि २०१९ ला आपण जो सिंहाचा (पान ७ वर)

## ठाकरे गटात पुन्हा भूकंप? निवडून आलेले दोन खासदार शिंदे गटाच्या संपर्कात

ठाणे: एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर खिळखिळ्या झालेल्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखालील शिवसेनेने लोकसभा निवडणुकीत ९ खासदार निवडून आणत महाराष्ट्राच्या राजकारणात अद्याप आपला करिष्मा काय असल्याचे दाखवून दिले होते. गेल्या दीड-दोन वर्षांमध्ये एकनाथ शिंदे यांनी एक-एक करुन ठाकरे गटाचे खासदार, आमदार आणि नेते फोडले होते. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर ठाकरे गटातील या गळतीला चाप बसेल, असा अंदाज होता. मात्र, ही अपेक्षा व्यर्थ ठरण्याची शक्यता आहे. कारण, आता शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली शिवसेनेकडून



लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाचे नव्याने निवडून आलेले दोन खासदार गळाला लावण्याची तयारी सुरु झाली आहे. शिंदे गटाचे ठाण्याचे नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांनी हा खळबळजनक दावा केला आहे.

लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाचे एकूण ९ खासदार निवडून आले होते. यापैकी दोन खासदार आमच्या संपर्कात असल्याचा दावा नरेश म्हस्के यांनी केला आहे. ठाकरे गटाच्या या दोन खासदारांनी आमच्याशी संपर्क साधला. आपल्या मतदारसंघात विकासकामे झाली पाहिजेत, अशी त्यांची इच्छा आहे. यासाठी या दोन्ही खासदारांनी पंतप्रधान (पान ७ वर)




## देशात सॅटेलाईट इलेक्ट्रॉनिक टोल प्रणाली लागू होणार

नवी दिल्ली : देशात लवकरच उपग्रह म्हणजेच सॅटेलाईटवर आधारित इलेक्ट्रॉनिक टोल संकलन प्रणाली लागू केली जाणार असून जीएनएसएस-आधारित इलेक्ट्रॉनिक टोल संकलनामुळे अधिक कार्यक्षम टोल संकलन होणार आहे. याबाबत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)ने जागतिक निविदा मागविल्या आहेत. ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम (जीएनएसएस) वर आधारित ही प्रणाली राष्ट्रीय महामार्गांवर चालणा-या वाहनांना अखंड टोल संकलनाचा अनुभव देईल असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे. एनएचएआयच्या या उपक्रमाचा उद्देश महामार्गांवरील सध्याची टोल बूथ प्रणाली संपविणे हा आहे.



एनएचएआयने सध्याच्या फास्टटॅग इकोसिस्टममध्ये जीएनएसएस-आधारित इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन (ईटीसी) प्रणाली लागू करण्याची योजना आखली आहे. सुरुवातीला संकरित मॉडेल वापरुन जेथे आरएफआयडी-आधारित ईटीसी आणि जीएनएसएस-आधारित ईटीसी दोन्ही एकाच वेळी कार्य करतील, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनानुसार, टोल प्लाझावर समर्पित जीएनएसएस लेन उपलब्ध असतील, ज्यामुळे जीएनएसएस-आधारित ईटीसी वापरणा-या वाहनांना मुक्तपणे जाण्याची परवानगी मिळेल. राष्ट्रीय महामार्ग वापरकर्त्यांना अखंड टोल संकलनाचा अनुभव प्रदान करण्यासाठी आणि टोल ऑपरेशनची कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी, इंडियन हायवे मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने (आयएचएमसीएल) एनएचएआय ही कंपनी, जीएनएसएस आधारित इलेक्ट्रॉनिक विकसित आणि लागू केली आहे. भारतातील टोल संकलन प्रणाली लागू करण्यासाठी पात्र कंपन्यांना आमंत्रित केले आहे.

सॅटेलाईट टोल संदर्भात निवेदन जारी

ॲडव्हान्स सॅटेलाइट तंत्रज्ञानाचा फायदा घेण्यासाठी, ईओएलचे उद्दिष्ट आहे की अनुभवी आणि सक्षम कंपन्यांची ओळख पटवणे जे एक मजबूत, स्केलेबल आणि कार्यक्षम टोल चार्जर सॉफ्टवेअर देऊ शकतात. तसेच जे ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टम (जीएनएसएस) आधारित इलेक्ट्रॉनिकच्या अंमलबजावणीसाठी आधार म्हणून काम करतील. (पान ७ वर)

## राज्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार वादळी वाऱ्याचीही शक्यता

नागपूर : गेल्या काही दिवसांपासून वाढलेले तापमान आणि उकाड्यामुळे नागरिक पुरते हैराण झाले असून आता सा-यांना पावसाची आतुरता लागली आहे. एकीकडे मान्सूनची चाहूल लागली असताना नैॅऋत्य मोसमी पाऊस कोकणातील रत्नागिरी, सोलापूर आणि पुढे मेडक, भद्राचलम विजयनगरम आणि त्यानंतर बंगालच्या खाडीपासून इस्लामपूरपर्यंत पोहोचल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. तसेच येत्या १० जूनपर्यंत मान्सून संपूर्ण महाराष्ट्रात दाखल होणार असल्याचा अंदाज आहे. मात्र, त्यापूर्वीच राज्यात मान्सून पूर्व पावसाने दमदार हजेरी लावली आहे.

हवामान विभागाने दिलेले अंदाजानुसार विदर्भातही दमदार पावसाने एंट्री करत एकच दाणादाण उडवली आहे. तर आजपासून पुढील पाच दिवस विदर्भातील जवळ जवळ सर्व जिल्ह्यांना नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला असून विजांच्या कडकडाटासह जोरदार वादळी वा-याचा अंदाजही हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. आजपासून पुढील पाच दिवस विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह ३०-५० किमी प्रती तास सोसाट्याचा वारा आणि (पान ७ वर)

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निसर्ग संवर्धनाचा जागर

लातूर / प्रतिनिधी- पर्यावरण दिन हा वृक्षांचा वाढदिवस, वृक्ष दिंडी, वॉक फॉर क्लायमेट चेंज, पर्यावरण पूरक पुस्तकांचे वाचन या उपक्रमाने साजरा केला.

५ जून जागतिक पर्यावरण दिन आणि पर्यावरण दिनानिमित्त २०१६ मध्ये लातूर वृक्ष चळवळ ,लातूर शहर मनपा व इतर सामाजिक संस्थांनी शहर परिसरात मुख्य रस्त्यावर लावलेल्या दहा हजार झाडांचा वाढदिवस साजरा केला. प्रतिनिधिक स्वरूपात औसारोड वरील पिंपळाचा वाढदिवस करण्यात आला.




यावेळी जिल्हाधिकारी वर्षा घुगे यांच्या हस्ते या परिसरात वृक्षारोपण पण करण्यात आले यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे , नगर परिषद सहायुक्त रामदास कोकरे, सह्याद्री देवराई व लातूर वृक्ष चळवळीचे समन्वयक सुपर्ण जगताप स्टीम एज्युकेशनचे ओमप्रकाश झुरळे, डॉ कल्याण बरमदे, मनपा सह आयुक्त मंजुषा गुरमे, पोलिस अधिकारी दयानंद पाटील, वर्शीप अर्थ फाउंडेशनचे आकाश सोनकांबळे, अँड बालाजी इंगळे, डॉ बी आर पाटील, आम्ही मावळे शिवबाचे डॉ निलम पन्हाळे जाधव, अँड सुनील गायकवाड, राहूल लोंढे, भीम दुनगावे, लातूर वृक्ष चे हेमंत रामढवे, कृष्णकुमार बांगड , आझम पठाण, मलाबार गोल्डचे आदम नजीर, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष गादगीने सर , कल्पना ओमप्रकाश झुरळे, प्राचार्य उमा माने, प्राचार्य रुपा सिरसेकर, बजाज मॅडम,खाकी फाउंडेशन चे विवेक जगताप हे उपस्थित होते.

यावेळी या सर्व सहभागी ५ वर्ष वयाच्या मुलांपासून ८० वर्षांच्या जेष्ठ नागरिकांसोबत सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी संवाद साधला. यावेळी उपस्थित सर्व चिमुकल्यांचे भावी पिढीचे आपण चांगल्या दृष्टीतून निसर्ग बघता म्हणून खूप कौतुक केले. पर्यावरणावर सादर केलेली लहान शालेय मूलांची कलाकृती पण त्यांनी पाहिली आणि त्यांना पर्यावरण दिनाचा निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला.

यानंतर सह्याद्री देवराई लातूर च्या महाविद्यालयीन मुलांनी वृक्षदिंडी काढत चांगभलं र चांगभलं वडाच्या नावानं चांगभलं घोषणा देत टाळ मृदंग वाजवत दिंडी काढली.

तसेच ज्येष्ठ नागरिकांनी, तरुण विद्यार्थ्यांनी मा. जिल्हाधिकारी वर्षा घुगे यांच्या हातात वातावरणातील बदलला कसे सामोरे जावे हा संदेश देणारे फलक घेऊन वातावरणातील बदला विरुद्ध ही आपली लढाई आहे आत्ता आपल्याला पृथ्वीला निसर्गाला सांभाळावे लागेल असे आवाहन करत पिंपळाचा वाढदिवस साजरा केला. शालेतील लहान चिमुकल्यानी पण झाडे निसर्ग हवा जैवविविधता याविषयी संदेश देणारे फलक घेत वॉक फॉर क्लायमेट चेंज मध्ये सहभाग घेतला. औसा रोड परिसरात असलेल्या स्टीम एज्युकेशन या शाळेपासून दिंडी जिल्हा क्रीडा संकुल पर्यंत आली उपस्थित नागरिकांचे दुकानदारांचे व पर्यावरण पूरक कार्य करणाऱ्या लोकांचे या दिंडीने, वॉक फॉर क्लायमेट चेंज ने सर्वांचे लक्ष वेधून घेतले .जिल्हा क्रीडा संकुल येथे लहान मुलांनी वृक्षारोपण (पान ७ वर)



## सायकल फेरीस शहरात चांगला प्रतिसाद

लातूर : प्रतिनिधी- सध्याच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याप्रती जनजागृती व्हावी, पर्यावरणाचे संतुलन राहावे यसाठी जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधन नितीन जसवंत चापसी व कल्ट सायकल क्लब यांच्या वतीने काढण्यात आलेल्या सायकल फेरीला चांगला प्रतिसाद मिळाला. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून फेरीची सुरुवात करण्यात आली. तसेच ते या फेरीमध्ये प्रत्यक्ष सहभागीही झाले.

या वेळी सहायक पोलीस निरीक्षक अशोक उजगीरे, पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते, लातूर सायकलिस्ट क्लबचे अध्यक्ष अमृत मेळकुंदे, उपाध्यक्ष अभिजीत सरसंबेकर, सचिव गणेश हाके, सायकल बडीजचे अध्यक्ष विकास कातपूरे, कोमल शिंदे, भाग्यश्री शिंदे, शिल्पा पाठक, वैशाली इंगोले, सपना मुंडे, विमल डोळे, धनंजय गुट्टे उपस्थित होते. यावेळी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी उत्तम आरोग्य राखण्यासाठी सायकल चालवण्याचे महत्व पटवून दिले. तसेच प्रत्येकाने इतर चार जणांना सायकल चालवण्यासाठी प्रोत्साहीत करावे, असे आवाहन केले.

# महात्मा बसवेश्वरमध्ये एमपीएससी/यूपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्व विकास केंद्राचे उद्घाटन

लातूर / प्रतिनिधी- सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये एमपीएससी/यूपीएससी परीक्षेकडे विद्यार्थ्यांचा कल आहे आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक जीवनामध्ये विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात एमपीएससी/यूपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि व्यक्तिमत्व विकास केंद्र शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठी कार्यान्वित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन नुकतेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, केंद्र समन्वयक तथा कला शाखा समन्वयक डॉ. बाळासाहेब गोडबोले, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. सिद्राम डोंगरगे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रास्ताविक करताना डॉ. बाळासाहेब गोडबोले म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे महात्मा बसवेश्वरांच्या वचनाची परिपूर्ती आणि श्री देशीकेंद्र महाराज यांच्या विचारांचा वसा घेऊन सातत्याने सन १९७० पासून मराठवाड्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील गरजू, गरीब आणि गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षण सेवा देत आहे. या महाविद्यालयांमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम, बी.एस.डब्ल्यू. आणि बी.सी.ए. अशा सहा शाखा असून समाजशास्त्र, गणित, तत्त्वज्ञान, भूगोल, इतिहास आणि राज्यशास्त्र अशा सहा शाखांमध्ये पदव्युत्तर शिक्षण दिले जात असून समाजशास्त्र, भूगोल आणि तत्त्वज्ञान या तीन विषयाचे संशोधन केंद्र आहे.

यावेळी बोलताना डॉ. सिद्राम डोंगरगे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग, कुस्ती प्रशिक्षण केंद्र आणि सांस्कृतिक विभागाद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा विषयक विकास सातत्याने सर्वांच्या सहकार्याने केला जातो.

यावेळी उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रवेश तर वरिष्ठ महाविद्यालयामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी, बी.एस. डब्ल्यू. आणि बी.सी.ए. प्रथम वर्षाचे सरळ प्रवेश सध्या सुरू आहे. या सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि व्यक्तिमत्व विकासाचे धडे मिळावे यासाठी महाविद्यालयातील विविध विषयाच्या प्राध्यापकांची टीम तयार करून विद्यार्थ्यांना आय.ए.एस., आय.पी.एस., एफ.ए.एस. आणि तत्सम परीक्षेसाठी मार्गदर्शन केंद्राची सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

या केंद्रामध्ये स्पर्धा परीक्षा तज्ञ, अनुभवी व प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनासोबत समाजकार्य शाखा समन्वयक डॉ. दिनेश मौने, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. राजकुमार लखादिवे, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, वाणिज्य शाखा समन्वयक डॉ. विजयकुमार सोनी, गणित विभाग प्रमुख डॉ. सुजित हंडीबाग, हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंतोष स्वामी, दुग्धशास्त्र आणि प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनायक वाघमारे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक चाटे आणि तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शीतल येरुळे यांचेही मार्गदर्शन मिळणार आहे

महाविद्यालयाच्या स्तुत्य उपक्रमाचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी,




कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे आणि इतर सर्व संचालक मंडळ पदाधिकाऱ्यांनी केले असून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा सुद्धा दिल्या आहेत.

तेव्हा दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या एमपीएससी/यूपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि व्यक्तिमत्व विकास केंद्राचा लाभ घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, केंद्र समन्वयक डॉ. बाळासाहेब गोडबोले आणि इतर सर्व शाखा समन्वयक आणि विभागप्रमुख यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्ही.एन.वलांडे, योगेश मोदी, राजाभाऊ बोडके, अशोक शिंदे, श्रीशैल्य पाटील यांनी परिश्रम घेतले.

# खुरगावला महिलांच्या श्रामणेर प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

नांदेड - येथील ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात दसदिवशीय महिलांच्या श्रामणेर प्रशिक्षण शिबीरास प्रारंभ झाला असून अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो, श्रीलंकेच्या भिक्खूनी आर्याजी उपलवन्ना तसेच आर्याजी प्रजापती यांनी एकूण २८ बौद्ध उपासक, उपासिकांना श्रामणेर दीक्षा दिली. यात दहा महिलांचा समावेश आहे.

सदरील शिबिर १९ जूनपर्यंत चालणार असल्याची माहिती भदंत पंयाबोधी थेरो यांनी दिली. यावेळी भिक्खू संघासह उपप्राचार्य साहेबराव इंगोले, इंजि. भरतकुमार कानिंदे, विपश्यनाचार्य गौतम भावे, रत्नमाला भावे, माया पाईकराव, प्रा. यशवंत पाईकराव, डॉ. प्रतिक्षा कोल्हे, दिनेश कोल्हे, सिद्धांत इंगोले, अपेक्षा इंगोले, प्रज्ञाधर ढवळे, आप्पाराव नरवाडे, नागोराव नरवाडे आदींची उपस्थिती होती.

तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात श्रामणेर प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येते. तसेच या प्रशिक्षण केंद्रात वर्षभर केव्हाही दीक्षा दिली जाते. श्रीलंकेच्या भिक्खूनी आर्याजी उपलवन्ना आणि आर्याजी प्रजापती यांच्या पुढाकाराने उपासिका ज्योती रोकडे, सावित्री आडकुते, सुरेखा इंगोले, इंदुबाई ढोले, कुसुम धुतराज, मयुरी धुतराज, सह्याद्री गच्चे, अंतरा राऊत, शिला पडघणे, हर्षदा पाईकराव यांना श्रामणेर दीक्षा दिली. तसेच प्रताप वाघमारे, अशोक शेळके, भीमराव इंगोले, हर्षद धुतराज, असंग गच्चे, रतन निवडंगे, रमेश सोनवणे, अविनाश धुतराज, आदर्श गच्चे, रामदास भिसे, विशाल गायकवाड, दर्शन मांजरमकर, प्रेमल गव्हाणे, भीमसेन वाघमारे, महेंद्र मगरे, आदर्श कांबळे, अभिराज हटकर, वैभव थोरात या बालकांनाही भदंत पंयाबोधी थेरो यांनी दीक्षा दिली.

# कव्हा सरपंच पदमिन सोदले यांनी केले स्नेहमेळावा व स्नेहभोज चे आयोजन



लातूर / प्रतिनिधी- लातूर तालुक्यातील कव्हा येथील सरपंच पदमीन सोदले यांनी गुरुवारी हॉटेल तुळशी औसा रोड लातूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय सहकरी तथा स्वामी दयानंद विद्यालय कव्हा येथून सन १९९३ मध्ये दहाव्वी उतीर्न होऊन बाहेर पडलेल्या मित्र परिवारासाठी तब्बल ३१ वर्षानंतर स्नेहमेळावा व स्नेहभोज चे आयोजन केले या स्नेह मेळाव्यास शालेय सहकारी आपल्या परिवारासह उपस्थित होते त्यांनी कार्यक्रमात आपल्या कुटुंबाचा परिचय करून दिला यात काही शालेय सहकाऱ्याचे मुल ,मुली एमबीबीएस , इंजिनिअरिंग , एमएससी , डॉ फार्मा , एम फार्मा , एमबीए , मध्ये शिक्षण घेत असल्याचे निदर्शनास आले ही सर्वा साठी आनंदाची बाब होती याचा मनस्वि आनंद झाला . तब्बल ३१ वर्षा नंतर भेटी झाल्यामुळे शालेय जिवनातील अठवणिना उजाळा देत एकमेकाची ख्यालीखुशाली जानून घेतली . सरपंच पदमिन सोदले यांच्या नेतृत्वात कव्हा ग्राम पंचायतने सन २०२३ मध्ये आर आर पाटील ग्राम स्वच्छता अभियानात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला होता या निमित्त सालेय सहकाऱ्याच्या वतीने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच पदमीन सोदले अर्चना लाटे , अनिता सुर्यवंशी , शोभा रुकारे , रेवती हेलाले , भूसे , मोना लाटे , अक्सा पठाण , शेख , नामदेव हेलाले ,तुकाराम हेलाले ,विजय कदम , विश्र्वभर घार , वाहेद देशमुख ,रफीक शेख ,सारंग हेलाले ,एल एम पठाण आदी उपस्थित होते.

# ज्ञान हाच भारतीय जीवनाचा मुलाधार :श्रीमती इंदुताई काटदरे

लातूर/प्रतिनिधी:अगदी पूर्वीपासून ज्ञान हाच भारतीय जीवनाचा मूळ आधार राहिलेला आहे. पाश्चात्यांच्या अनुकरणामुळे हे ज्ञान आज अव्यवस्थित झाले आहे.जागतिक वर्तमान परिस्थितीत भारताला ज्ञाननिष्ठ देश बनविण्यासाठी शास्त्रांचे मूळ सिद्धांत सर्वांसमोर आणले पाहिजेत,असे प्रतिपादन पुनरुत्थान विद्यापीठाच्या कुलपती श्रीमती इंदुताई काटदरे यांनी केले.

कर्णावती येथील पुनरुत्थान विद्यापीठाच्या वतीने हरंगुळ येथील जनकल्याण विद्यालयात अखिल भारतीय विद्वत परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.या परिषदेचे उद्घाटन करताना श्रीमती इंदुताई काटदरे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुलबर्गा येथील बसवराज पाटील तर व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भैय्याजी जोशी,देवगिरी प्रांताचे प्रांत संघचालक अनिल भालेराव,परिषदेचे संयोजक संदीप रांकावत यांची उपस्थिती होती.

उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना श्रीमती काटदरे म्हणाल्या की,पूर्वी भारतीय ज्ञान व्यवस्थित होते परंतु आज ते अव्यवस्थित झालेले आहे. ही परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी तीन टप्प्यात काम करावे लागणार आहे.अवस्थिति पासून व्यवस्थिती,अनुवस्थिती ते व्यवस्थिती व अव्यवस्थिती पासून व्यवस्थिती पर्यंत आपल्याला वाटचाल करावी लागणार आहे. भारतीयांनी आपले जीवन ज्ञाननिष्ठ




बनवलेले आहे. इतर देशांच्या दृष्टीने भारतीय निरक्षर असतील परंतु ते अज्ञानी नाहीत. ज्ञानाचे प्रथम प्रकटीकरण अनुभूतीजन्य असते.चार वेद हेच मूळ ज्ञान आहे. ऋषीमुनींनी ते आपल्या वाणीतून प्रकट केले.महर्षी व्यासांनी त्याचे संपादन केले.श्री गणेशाने दिलेल्या लिपीमुळे ते ग्रंथरूपात उपलब्ध झाले.४ वेद,६ वेदांग व ४ उपवेद अशा एकूण १४ विद्या आहेत.

वेद हा पाठांतर करण्याचा विषय नाही तर त्यातील तत्वज्ञान जीवनात लागू झाले पाहिजे,असे त्या म्हणाल्या.

इंदुताईंनी सांगितले की, ज्ञान हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. हे ज्ञान सर्वांसाठी सुलभ होणे गरजेचे आहे. आपल्या मूळ ज्ञानाला बाजूला सारून पाश्चात्त्यांनी त्यावर आक्रमण केले. मंदिरांसोबतच ग्रंथही नष्ट करण्यात आले.त्यामुळे आपण क्षीणप्राण झालो. ज्ञान क्षेत्रावर आक्रमण झाल्याने आज आपण सर्वच क्षेत्रात त्यांचे अनुकरण करत आहोत. देशातील विद्यापीठात आज जे शिक्षण दिले जाते ते अभारतीय आहे.आजची दृष्टी अर्थकेंद्री व कामकेंद्री झाली आहे.पाश्चात्य आक्रमणानंतर भारतीय ज्ञान प्रदूषित झाले असल्याचेही श्रीमती काटदरे म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोपात बसवराज पाटील यांनी ज्ञान या शब्दाचीच हत्या झाली असल्याचे मत व्यक्त केले.आज ज्ञानासाठी शिक्षण दिले जात नाही.भारतात ८०० शास्त्र असून ते एकमेकांसाठी पूरक आहेत,असेही ते म्हणाले.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. संयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. उद्घाटन सत्रानंतर झालेल्या दुसऱ्या सत्रात मराष्ट्रीय शिक्षा हेतू किये गये प्रयास और उनके परिणामम यावर राकेश मिश्रा यांनी विचार मांडले. आज दिल्या जाणाऱ्या शिक्षणात मूळ भारतीय ज्ञान दिले जात नाही. शैक्षणिक धोरण याला कारणीभूत आहे.या धोरणाचा भारतीय संस्कृतीशी संबंध नाही. शिक्षण प्रणाली मूळ उद्देशापासून दूर असल्याने ज्ञान एकमेकांना पूरक ठरत नाही,असे मत त्यांनी व्यक्त केले.

चर्चासत्रात सहभागी झालेले अंकित शहा यांनी मब्रिटिश क्लासरूम मॉडेलफ या विषयावर विचार मांडताना भारत व पाश्चात्य देशांच्या अर्थ मॉडेलमध्ये फरक असल्याचे आधारेखित केले.आपण पुनर्जन्म मानतो पण पाश्चात्य संस्कृतीत एकच जन्म असल्याचे मानले जाते.पाश्चात्य जगतात अति स्वातंत्र्यामुळे एकटेपणा आला आहे.सनातन इकॉनॉमिक मॉडेलसाठी मंदिर इकोसिस्टीम गरजेची आहे.ब्रिटिश मॉडेल मधून बाहेर पडण्यासाठी ती उपयोगी ठरेल.ब्रिटिश मॉडेलमुळे आजची विवाह संस्था देखील बिघडली असल्याचे ते म्हणाले.

चर्चासत्राचे अध्यक्ष स्थान भूषवताना अरुण कुमार उपाध्याय यांनी भारतीय शास्त्र एका जन्मात समजणे अशक्य असल्याचे स्पष्ट केले. आक्रमणानंतर मंदिरे पाडून ग्रंथही नष्ट केले गेले. त्यातील जे काही आज शिल्लक आहेत त्यावरून संशोधन सुरू आहे. त्यात समन्वय साधला तर ज्ञान मिळू शकते.आज विविध क्षेत्रात होणाऱ्या संशोधनांना कसलाही अर्थ उरला नसल्याचे ते म्हणाले.

या सत्राचे संचलन नियती सप्रे यांनी केले. श्रीराम देशपांडे यांनी उपस्थित मान्यवरांचा ग्रंथ भेट देऊन सन्मान केला. स्व.बाळासाहेब देवरस सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास देशभरातून आलेल्या मान्यवरांसह संयोजन समितीतील पदाधिकारी व निमंत्रितांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नवोन्मेष आणि सामर्थ्यांचे प्रतिक: वर्षा ठाकूर-घुगे

विकासाचा केंद्रबिंदू मानून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी विविध कामाच्या माध्यमातून लातूर जिल्हयाला नवा आयाम दिला आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आखून दिलेल्या कामामध्ये अधिकारी आणि कर्मचारी उत्साहाने काम करतात, त्यामुळे कामकाजाला गती मिळते.

लातूर जिल्ह्याच्या ४० वर्षाच्या प्रशासकीय कारभारात जिल्हाधिकारी म्हणून प्रथमच एका महिलेच्या हाती कारभार देण्यात आला आहे. कर्ता चांगला असेल तर प्रगतीचा मार्ग गतिमान होतो, हे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूरकरांना दाखवून दिले आहे. वर्षा ठाकूर-घुगे ह्या दिनांक २३ जुलै २०२३ रोजी जिल्हाधिकारी म्हणून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू झाल्या. त्यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून आपला ठसा उमटवला आहे. केवळ आठ महिन्यात अधिकारी, कर्मचारी व जनतेमध्ये त्यांनी चांगले ऋणानुबंध निर्माण केले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी त्यांच्या संपूर्ण टीमच्या विश्वासाच्या जोरावर आव्हानात्मक भूमिका पार पाडत आहेत.

शिक्षणातील विविध टप्पे ओलांडत, प्रशासकीय सेवेत यशस्वी प्रवेश करत, सक्षमपणे अधिकारीपदाची धुरा सांभाळणाऱ्या वर्षा ठाकूर मराठवाड्याच्या पहिल्या महिला जिल्हाधिकारी ठरल्या आहेत. ठाकूर यांचे शिक्षण भोसला मिलिटरी कॉलेजमध्ये झाले. तिथूनच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. प्रशासनातील कर्तव्यदक्ष आणि सक्षम महिला अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचे नाव लौकिक आहे. ठाकूर यांनी बजावलेल्या बालकामगार प्रकल्पाच्या प्रमुख म्हणून केलेल्या कामगिरीची विशेष नोंद शासन व आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेतर्फे घेतली गेली होती. नांदेड जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी म्हणून कार्य बजावतांना विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून राज्यात नांदेडला बहुमान मिळवून दिला. लातूर जिल्हयातही जिल्हाधिकारी म्हणून वर्षा ठाकूर-घुगे यांनी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. दैनिक लोकसत्ता जिल्हा निर्देशांक पॅरामीटर्समधील कृषी, आरोग्य, शिक्षण, वाणिज्य आदी क्षेत्रातील जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी उत्कृष्ट कामगीरी केल्याबद्दल विकास निर्देशांकात लातूर जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आला. यानिमित्त मुंबई येथे झालेल्या सोहळ्यात त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनाच्या आदल्या दिवशी १ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास हा उपक्रम लातूर जिल्हयात राबवला. यामध्ये स्वच्छता व सफाई या बाबींवर लक्ष केंद्रीत केले होते. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती क्षेत्र, ग्रामीण भागातील बसस्थानके, पर्यटन स्थळे, वारसास्थळे, नदी किनारे, नाले आदी ठिकाणी अभियानांतर्गत स्वच्छता मोहिम राबवल्याने मोठया प्रमाणात स्वच्छता झाली. तसेच मुंबई-ठाणेच्या धर्तीवर नागरीकांच्या सहभागाने



ई- कचरा संकलन तसेच स्व्च्छतेसाठी हाती घेतलेला दशसुत्री प्रभावी ठरत आहे. यामध्ये मंदिराला जोडणारे रस्ते, मंदिर परिसर, किल्ले, बारव यांना जोडणारे रस्ते आणि आजुबाजुचा पाचशे मीटरपर्यंत विशेष स्वच्छता मोहिम शहराच्या विकासाठी महत्वाचा टप्पा आहे.

संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या रूपाने जिल्हयातील पहिल्या दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन करुन दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविण्याच्या उपक्रमात हाती घेतला. लातूर येथे झालेल्या विभागीय स्तरावरील नमो महारोजगार मेळाव्यात सुमारे ४ हजार ३४८ हून अधिक उमेदवारांना नोक-यांची ऑफर मिळाली आहे. ग्रामीण युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून अनेकांना लाभ मिळाला आहे. रोजगार निर्मितीचा लातूर पॅटर्न राज्यात निर्माण करण्याचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-यांना मानस आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महसूल वसुलीला प्राधन्य दिले. त्यांनी आखलेल्या नियोजनातून महसूल वसुलीचे १०६ टक्के उदिष्ट साध्य झाले आहे. ७० कोटी ९९ लाख रुपयांची महसूल वसुली शासनास जमा करण्यात आली आहे. तसेच महसूल सप्ताहादरम्यान लातूर जिल्हयात युवा संवाद, मदत एका हाताने, सेवा अधिकारी व कर्मचारी संवाद, महसूल न्यायालय, लोकसंवाद, लष्करी संवाद आदी उपक्रम त्यांनी घेतले. निवडणूक ते नैसर्गिक आपत्ती या प्रत्येक बाबतीत महसूल विभागाची प्रमुख भूमिका आहे. सर्वसामान्य जनतेला योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच त्यांच्या मनातील प्रशासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी कार्यालयात समस्या घेऊन येणा-या नागरिकांशी सुसंवाद ठेवून, यांनी तक्रार केवळ कागद म्हणून न वाचता ती तक्रार मानवी दृष्टीकोन ठेवून समजून घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा पुढाकार असतो.

गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियानाला त्यांनी गती दिली. जिल्हयातील १०३ तलावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यासाठी १२ कोटी रूपये मंजूर करण्यात आले. ज्यामुळे ३५ लाख घनमीटर गाळ काढून जिल्हयातील शेतक-यांच्या जमीनी सुपीक होणार आहेत. मागच्यावर्षी लातूर जिल्हयात कमी पाऊस झाल्याने जिल्हयात झालेल्या पाणी टंचाईचा समाना करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलेले सुक्ष्म नियोजन प्रभावी ठरले. त्यांनी उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवला. जलाशयांमधून अवैध उपसा थांबविण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली. तसेच पावसाळयापूर्वी मोठया प्रमाणात वृक्षलागवड, जलसंधारणाची कामे, भूजल पुनर्भरण आदीचे नियोजन केले. जंगलातील पुर्नवनीकरण योजनेत १५ हेक्टरवर रोपांची लागवड, पाणी व मातीची धूप रोखण्यासाठी वॉटर हार्वेस्टिंग व कॉन्टूर ट्रेंचिंक आदी उपक्रम हाती घेतले. महिला सक्षमीकरणासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांचा नेहमीच पुढाकार असतो. त्यांनी पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर स्त्री-शक्ती सन्मान शिबिराचे आयोजन करुन जिल्हयातील दहा तालुक्यामध्ये १ हजार ६८० महिलांशी संर्पक साधून त्यांना प्रमाणपत्र व इतर योजनांचा लाभ दिला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेत जिल्हयातील एक पालक, अनाथ, अंपग अशा एकूण २ हजार २४१ मुलांना दरमहा २२५० रुपये अनुदान दिले. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिल्हयात कार्यक्रमाचे आयोजन करुन महिला सक्षमीरणावर भर दिला. याशिवाय क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, महिला स्वयंसहाय्यता गटांना प्रशिक्षित करून त्यांना उद्योजक बनविणे, रेशीम उद्योगाला चालना देणे, अनुसूचित जाती, जमाती, आदिवासी तसेच विविध योजनेचे लाभार्थ्यांना लाभ मिळवून देणे, श्रावण बाळ योजनेला प्राधान्य देणे, पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेणे, हेरिटेज वॉक उपक्रम, पर्यटन व पारंपरिक वारसा जोपासण्यासाठी पुस्तकाची निर्मिती अशा कितीतरी बाबींवर लातूर जिल्ह्याचे नाव राज्याच्या नकाशावर आणण्याचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा माणस आहे.

खरं तर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घूगे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपल्या कामाची वेगळी ओळख निर्माण करणा-या अधिकारी आहेत. त्या सतत जिल्हाभरात फिरून कामाचा आढावा घेतात. त्यांची काम करण्याची हातोटीच निराळी आहे. जे काम हाती घेतले ते काम वेळेत पूर्ण करून दाखतात. त्यांचा लोकांशी असेलेला संवाद, अधिकारी व कर्मचाऱ्यांची अडचणी समजून त्या सोडवणे व त्यांना मार्गदर्शन हा त्यांचा नित्यांचाच भाग आहे. आपल्या कामातून ठसा उमटवणा-या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा आज वाढदिवस त्यानिमित्त त्यांना लाख-लाख शुभेच्छा.

**- मिलिंद व्यवहारे, नांदेड**
मो. ८६२६०२५८२५

यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. ०९ जून २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# शेत रस्ता खुला न केल्यास शेतकरी आत्मदहन करणार

धाराशिव दि.९ (प्रतिनिधी) – तालुक्यातील बरमगाव बु. येथील एका शेतकऱ्याला त्याच्या शेतामध्ये जाण्यासाठी सामुदायिक बांधावरून असलेला शेत रस्ता शेजारील शेतकऱ्यांनी अडविला आहे. त्यामुळे शेत रस्ता देऊन न्याय द्यावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि.९ जून रोजी आत्मदहन करणार असल्याचा इशारा पीडित शेतकऱ्याने जिल्हाधिकाऱ्यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव तालुक्यातील बरमगाव बु. येथील राजकुमार गजेंद्र ढवळे यांची बरमगाव शिवारामध्ये गट नंबर १३४ जमीन आहे. त्या शेतास जाण्या व येण्यासाठी गट नंबर १३३, १३४ व १३५ या शेत जमिनीच्या बांधावरून रस्ता आहे. मात्र तो रस्ता दगडांची पोळ, लाकडे व काटेरी झाडे टाकून अडविल्यामुळे त्यांना शेतात जाण्यायेण्यास रस्ताच राहिलेला नाही. तसेच ते शेतकरी जाण्यायेण्यासाठी अडवणूक करुन जिवे मारण्याची धमकी देत आहेत. त्यामुळे मला शेतात जाण्यासाठी रस्ता देऊन न्याय द्यावा, अशी मागणी तहसिलदार, जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असताना देखील अद्यापपर्यंत न्याय मिळालेला नाही. त्यामुळे शेतातील ऊस पिकाचे नुकसान झाले असून आता पेरणी करण्यासाठी जायचे कसे ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मला न्याय द्यावा अन्यथा मी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि.९ जून रोजी आत्मदहन करणार असल्याचा इशारा ढवळे या शेतकऱ्याने दिला आहे.

# खा. राजेनिंबाळकर यांचा सोशल मीडियाचा फंडा इतर पक्ष देखील राबविणार

## सर्वसामान्यांना केलेले फोन विजयाचे गमक

मल्लिकार्जुन सोनवणे

धाराशिव दि.८ – लोकसभा निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मी सर्वसामान्य व्यक्तींचे फोन घेऊन त्यांना माझ्या परीने शक्य तेवढी मदत केली असे सांगून पूर्ण प्रचारात राळ उडवून दिली होती. विशेष म्हणजे जनतेला केलेल्या संपर्काच्या साह्यावरच मी पुन्हा पहिल्यापेक्षा या निवडणुकीत एक तरी मत जास्त घेईन असे वारंवार सांगून विरोधकांना एक प्रकारे आव्हानच दिले होते. त्यामुळे विरोधकांनी या वक्तव्याचा समाचार घेत खा राजेनिंबाळकर यांची खिल्ली उडवली होती. मात्र मत मोजणीतून त्यांनी ते सिद्ध केले. त्यामुळे विरोधक देखील आता प्रत्येक व्यक्तीचा फोन नंबर गोळा करण्याच्यादृष्टीने पावले उचलू लागले आहेत. तर खा. राजेनिंबाळकर यांच्या विजयाचा सोशल मीडियाचा फंडा इतर पक्ष देखील राबविण्याची तयारी विरोधकांनी सुरु केली आहे.

धाराशिव लोकसभा मतदार संघामध्ये महा विकास आघाडीचे उमेदवार खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी प्रत्येक ठिकाणच्या प्रचार सभेमध्ये मी माझ्या पाच वर्षाच्या कालावधीत मतदारसंघातील ज्या लोकांनी मला फोन केले. त्यांचे फोन तर उचललेच. शिवाय कामाच्या व्यस्ततेमध्ये असताना फोन उचलता नाही आला तर काम संपल्यानंतर मी त्यांना रिटर्न फोन लावला. संबंधित व्यक्तीस त्यांचे काय व कोणते काम नडले आहे. याची अस्थिवायिकपणे विचारणा करीत होतो. त्यांनी त्यांची सांगितलेली कैफियत ऐकून खा राजेनिंबाळकर यांनी संबंधितांना त्याबाबत सांगून त्यांची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्याबरोबरच कार्यकर्ता व पदाधिकाऱ्याला देखील त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा दिल्या. इतकेच नाही तर एखाद्याची टू व्हीलर किंवा फोर व्हीलर गाडी पंक्चर झाली व त्यांनी फोन केला तर त्यांना स्टेफनी व टॉमी उपलब्ध करून देण्यासाठी देखील मी फोनद्वारे प्रयत्न केले असल्याचे त्यांनी प्रचारा दरम्यान वारंवार सांगितले. त्यांनी फक्त सांगितलेच नाही तर अनेक व्यक्तींची नावे व संदर्भ देऊन सभा गाजविल्या. त्यामुळे सभेचे वातावरण भाऊ होऊन....कहो दिल से.... ओमराजे फिरसे.... अशा घोषणा बाजी करीत संपूर्ण सभेचे वातावरण विजय खा राजेनिंबाळकर यांचा निश्चित होणार असल्याचा थेट संदेश देत होते. त्यांच्या विजयाच्या यशाचे गमक हे फक्त आणि फक्त सर्वसामान्य लोकांना केलेले व उचललेले फोन हेच असल्याचे विरोधकांनी देखील हेरले आहे. त्यामुळे खासदार राजेनिंबाळकर यांच्या सोशल मीडियाचा वापराचा फंडा आपणही सुरू करावा यासाठी प्रयत्न सुरू केल्याचे दिसून येत आहे. हा धाराशिव लोकसभा मतदार संघातील खा राजेनिंबाळकर यांचा विजयी फार्मूला राज्यसह देशात देखील सुरू होण्याची दाट शक्यता आहे.




# माथाडी कामगाराच्या नातेवाईकास कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने उपचारासाठी मदत



परंडा दि.८ (प्रतिनिधी) – येथील मंडई भीम नगरमधील हमाल माथाडी कामगार हर्षवर्धन बनसोडे यांच्या मातोश्री उषा गजेंद्र बनसोडे यांचा मागील आठवड्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात अपघात झाला असल्याने त्यांना सोलापूर येथील रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आहे.

माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील व माजी आमदार राहुल मोटे यांच्या सूचनेवरून कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने तातडीच्या आर्थिक मदतीचा धनादेश राहत्या घरी नातेवाईकांच्या हातात शिवसेना (ठाकरे) चे जिल्हाप्रमुख रणजीत ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयकुमार जैन, उपसभापती संजय पवार, संचालक ॲड.सुजित देवकते, संचालक शंकर जाधव, संस्थेचे सचिव सचिन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, घनश्याम शिंदे, जीवन बनसोडे, रणजीत शिंदे, विजय चौतमहाल, अजय चौतमहाल, सुजाताबाई बनसोडे, बेबीताई चौतमहाल, कामीनाबाई बनसोडे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

# नीट परीक्षेतील यशाबद्दल शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचा मनसेच्यावतीने सत्कार

धाराशिव दि.८ (प्रतिनिधी) – तालुक्यातील महाळंगी येथील शेतकरी कुटुंबातील नीट परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थी व पालकांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

धाराशिव तालुक्यातील महाळंगी येथील गौरी धनराज ढवळे गुण ५३३ गुण व सानिका नेताजी आगळे ४६५ गुण मिळवून भरघोस यश प्राप्त केले आहे. त्याबद्दल त्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मनसेचे तालुकाध्यक्ष पाशाभाई शेख, सरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व्यंकट पाटील, मनसे विज कामगार सेनेचे राज्य सचिव तथा महावितरणचे सहाय्यक अभियंता महावितरण विशाल कांबळे, मनसेचे धाराशिव शहराध्यक्ष नवनाथ चव्हाण, माजी चेअरमन जीवन पाटील, माजी सरपंच जालिंदर ढवळे, माजी उपसरपंच बाबासाहेब आगळे, मेजर व्यंकट जाधव , राम पाटील, गौतम पाटील, व्यंकट ढाळे, नेताजी आगळे, धनराज ढवळे, मदन काळे, नेताजी डफळे, सचिन जाधव, बाबा सय्यद, संतोष ढाळे, ईसाक शेख आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



# मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्याकडून उसाला एक रक्कमी एफआरपी प्रमाणे रक्कम अदा

धाराशिव दि.८ (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यात गत हंगामात नव्याने दाखल झालेल्या मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रा.लि. या कारखान्याने पहिल्याच गळीत हंगामात गाळप केलेल्या शेतकऱ्यांच्या उसाला ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना दर १० दिवसांनी एक रक्कमी प्रती मेट्रीक टन २६०० रुपये प्रमाणे रक्कम अदा केली आहे. पहिल्याच हंगामात एफआरपीपेक्षा जास्त ऊस दर देवुन ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताची जपणूक केली असल्याची माहिती कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी दिली आहे.

मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रा.लि. या कारखान्याने पहिल्याच गळीत हंगाम सन २०२३थ२४ मध्ये ४,०९, २११.६७६ मे. टन ऊसाचे गाळप करुन ४,४१,५२७ क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. तर १०.९३६ टक्के इतका सरासरी साखर उतारा प्राप्त केला आहे. कारखान्याचे मार्गदर्शक तथा सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार कारखान्याची वाटचाल यशस्वीपणे चालु आहे. गाळप हंगाम २०२३–२४ मध्ये कारखान्याचा निव्वळ देय एफ.आर.पी. दर प्रती मेट्रीक टन रुपये २४३०.८२ एवढा येत आहे. परंतू कारखान्याने गाळप हंगामाच्या सुरुवातीपासुनच ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना दर १० दिवसांनी एक रक्कमी प्रती मेट्रीक टन २६०० रुपयांप्रमाणे रक्कम अदा करुन पहिल्याच हंगामात एफ.आर.पी. पेक्षा जास्त ऊस दर देवून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताची जपणूक केली आहे. येणाऱ्या गाळप हंगामामध्ये कारखान्याच्या कार्यक्षेत्रात जास्तीत जास्त साखर उतारा देणाऱ्या व हेक्टरी उत्पादनात वाढ होणाऱ्या ऊस जातीची लागवड मोठ्या प्रमाणात होण्यासाठी कारखान्यामार्फत ऊस विकास योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे या योजनेचा जास्तीत जास्त लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी केले आहे.

# जाळून नुकसान करुन जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव दि.८ (प्रतिनिधी) – एका महिलेस जातीवाचक शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन घरामध्ये पेट्रोल टाकून घरातील घरगुती सामानाचे व मुलांची कागदपत्रे जाळून नुकसान केले. या प्रकरणी संबंधित आरोपी विरोधात ट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार धाराशिव शहरातील तांबरी विभागातील हणुमंत केशव साळुंके (वय ५० वर्षे) यांनी दि. १ ऑगस्ट २०२३ रोजी १० वाजण्याच्या सुमारास ते दि. ४ जून २०२४ रोजी १ वाजण्याच्या सुमारास धाराशिव शहरातील रामनगर येथील एका ३२ वर्षीय महिलेला साळुंके यांनी जातीवाचक शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन घरामध्ये पेट्रोल टाकून घरातील घरगुती सामानाचे व मुलांची कागदपत्रे जाळून नुकसान केले. या प्रकरणी पीडित महिलेने दि.७ जून रोजी दिलेल्या तक्रारीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात भा.द.वि.सं. कलम ४३६, ३२३, ५०४ सह अ.जा.ज.अ.प्रतिबंधक कायदा कलम ३ (२) (व्ही) (टी), ३ (१) (आर) (एस) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# जिल्हा कृषी निविष्ठा तक्रार व अडचण निवारणासाठी संपर्क अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

धाराशिव दि.८ (प्रतिनिधी) – खरीप हंगाम पेरणी तोंडावर आले असून अनेक बी – बियाणे, खत विक्रेते दुकानदार बोगस व निकृष्ट दर्जाचे बियाणे खत व कीटकनाशक विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करीत असतात. ते फसवणूक होऊ नये यासाठी जिल्हा कृषी निविष्ठा तक्रार करण्यासाठी व अडचण सोडविण्यासाठी जिल्हा, तालुका स्तरीय कृषी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांनी बी – बियाणे खते व किटकनाशके खरेदी करण्याचा सपाटा लावला आहे. पेरणीयुक्त पाऊस होताच पेरणी केली जाते. मात्र पेरणीनंतर अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये दुकानातून खरेदी केलेल्या बियाणांची व्यवस्थितरित्या उगवण होत नाही. तसेच खतामध्ये देखील वाळू मिश्रीत असल्याच्या तक्रारी दरवर्षी कृषी विभागाकडे मोठ्या प्रमाणात प्राप्त होतात. त्या सोडविण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कृषी विकास अधिकारी, मोहीम अधिकारी, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, तालुका कृषी अधिकारी, पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी यांचे नाव व संपर्क नंबर पुढील प्रमाणे – जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने – ८९७५०११९००, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी प्रमोद राठोड – ९१५६२०८८८२, मोहीम अधिकारी गरगडे – ९४२०१५३३१५, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक प्रवीण पाटील – ८८३०६३२३३७, धाराशिव तालुका कृषी अधिकारी एस पी जाधव – ९४०३६९५७००, पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी काळे – ९३२५१४१९८९, तुळजापूर तालुका कृषी अधिकारी – मुळे – ८८३०९०१७०१, पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी पिंपरकर – ९९२३६४४६८२, लोहारा तालुका कृषी अधिकारी देवकते – ९४२३६११९५१, पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी (लोहारा व उमरगा) निंबाळकर – ७०२०१८६६३१, उमरगा तालुका कृषी अधिकारी डी बी रितापुरे – ९४०४९५७५०१, कळम तालुका कृषी अधिकारी सरडे – ८२७५८३२६१४, पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी बंडगर – ७४४८१०९१९८, वाशी तालुका कृषी अधिकारी बर्वे – ९३७३८७१५९७, पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी माळी – ९४२०१७५३०७, भूम तालुका कृषी अधिकारी ढवळे – ९०९६८५९७७९, पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी दराडे – ९३५६८५१५०४, परंडा तालुका कृषी अधिकारी – ९८२२५११९०४ व पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी चव्हाण – ८९९९९१५००१ तसेच जिल्हास्तरीय तक्रार संपर्क नंबर ०२४७२ – २२३७९४ व राज्यस्तरीय संपर्क नंबर ९८२२४४६६५५ असे आहेत. शेतकऱ्यांना बी – बियाणे, खत किंवा कीटकनाशका संदर्भात काही अडचणी असतील तर वरील नंबर वरती संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी माने यांनी केले आहे.

# जिल्ह्याचे सुपुत्र, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे यांना राष्ट्रपती पोलीस पदक

## राज्यपाल बैस यांच्या हस्ते झाला सन्मान



धाराशिव दि.८ (प्रतिनिधी) – येथील जिल्ह्यातील अनेकजणांनी प्रशासकीय सेवेत गौरवास्पद कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. त्यात आणखीन जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी कामगिरी धाराशिव जिल्ह्याचे सुपूत्र व सहकार नगर, पुणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत सुरेंद्र गजेंद्र माळाळे यांनी केली आहे. त्यांनी पोलीस दलात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

राजभवन मुंबई येथील दरबार सभागृहात ६ जून रोजी २०२२ च्या प्रजासत्ताकदिनी जाहीर झालेले पोलीस पदक महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते माळाळे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्यासह पोलीस अधिकारी व गौरविण्यात आलेल्या पोलीस अधिकार्यांचे कुटुंबिय उपस्थित होते. माळाळे यांच्या रूपाने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याने त्यांचे जिल्ह्यातील विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. धाराशिव शहरातील भीमनगरमधील ते रहिवाशी आहेत. स्मृतिशेष गजेंद्र आप्पाराव माळाळे व स्मृतिशेष मोहरबाई गजेंद्र माळाळे यांचे ते सुपूत्र आहेत. त्यांचे शालेय शिक्षण धाराशिव शहरात तर उच्च माध्यमिक शिक्षण लातूर येथे झाले आहे. त्यांनी परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठातून बी.एसस्सी व एम.एसस्सी पदवी मिळविली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पहिल्याच परिक्षेत ते पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवडले गेले. सन १९९५ मध्ये ते पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून रूजू झाले. त्यांनी आतापर्यंत नागपूर, गडचिरोली, सीआयडी गुन्हे शाखा, जालना पोलीस प्रशिक्षण, जालना स्थानिक गुन्हे शाखा आदी ठिकाणी आपले कर्तव्य बजावले आहे. माळाळे यांनी खून, दरोडे, घरफोडी आदी गंभीर स्वरूपाचे गुन्हे उघडकीस आणली आहेत. गडचिरोलीसारख्या नक्षलवादी भागात त्यांनी सतत उद्भवणारी गंभीर परिस्थिती मोठ्या हिंमतीने हाताळली आहे. सुरेंद्र माळाळे यांना आतापर्यंत महाराष्ट्र शासनाचे स्वातंत्र्याचे ५० वर्षे पदक, खडतर सेवा पदक, अंतर्गत सुरक्षा पदक, डी.जी इन्सिगनिया अवॉर्ड, स्वातंत्र्याची ७५ वर्षे पदक, उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून पोलीस महासंचालकांचे प्रशस्तीपत्र, राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून उत्कृष्ट कार्याचे प्रशस्तीपत्र, २०२२ चे राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त आहेत. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.




# अर्जुन रामपालने रचला इतिहास, चाइल्स रिलीफ अ‍ॅन्ड यूफ अमेरिकेसाठी १.५ डॉलर दशलक्ष केले जमा

मुंबई,-अर्जुन रामपालने चाइल्ड रिलीफ अ‍ॅन्ड यू अमेरिकेसाठी १.५ डॉलर दशलक्ष जमा केले असून तो इतकी मदत करणारा पहिला भारतीय स्टार बनला आहे. अर्जुन रामपालने बाल हक्कांसाठी हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. अर्जुन आणि एनजीओ 'चाइल्ड रिलीफ अ‍ॅन्ड यू' अमेरिका यांनी मिळून बालकांच्या हेल्दी आणि एजुकेशन लाइफ सुधारण्यासाठी पुढाकार घेतला आहे. अर्जुन रामपालसाठी 'चाइल्ड रिलीफ अ‍ॅन्ड यू' अमेरिकाच्या अध्यक्षा शेफाली सुंदरलाल यांनी म्हटलं, ''एप्रिल २०२४ मध्ये युनायटेड स्टेट्समध्ये आमच्या ५ सीआरवाय गाला कार्यक्रमांसाठी सेलिब्रिटी पाहुणे म्हणून अर्जुन रामपाल आले याबद्दल आम्ही खूप आभारी आहोत. त्याच्या जिद्द आणि करिश्मामुळे मुलांच्या हक्कांसाठी लढण्यास मदत झाली आहे. मुलांसाठीचे आमचे ध्येय पुढे नेण्यासाठी अर्जुनचे आम्ही मनापासून कौतुक करतो. या मदतीचा खूप फायदा होणार आहे.''



अर्जुन रामपाल केली 'चाइल्ड रिलीफ अ‍ॅन्ड यू' एनजीओला मदत : यानंतर अर्जुन रामपालनं म्हटलं, ''गेल्या २० वर्षापासून फाउंडेशनशी संबंधित सर्व समर्थकांचं मी आभार मानतो, 'चाइल्ड रिलीफ अ‍ॅन्ड यू' अमेरिकेनं अंदाजे ८००,००० वंचित मुलांना जीवन दिलं आहे. यानंतर प्रोजेक्ट पार्टनर डॉ. रोली सिंग यांनी म्हटलं, अर्जुननं या मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी 'चाइल्ड रिलीफ अ‍ॅन्ड यू' अमेरिकाला केलेलं समर्पण हे बदलाचे प्रतीक बनले आहे, त्यानं अनेक लोकांना या मोहिमेमध्ये सामील होण्यास प्रवृत्त केलं आहे. त्याच्या आवाहननं आणि यावरील अतूट विश्वासामुळे लोकांचे लक्ष वेधून घेतलं होतं.'' आता ही बातमी समोर आल्यानंतर अर्जुनचे चाहते आणि काही सेलिब्रिटी त्याचे सोशल मीडियाद्वारे कौतुक करत आहेत.

वर्कफ्रंट : अर्जुन रामपाल हा सोशल मीडियावर खूप सक्रिय असतो. तो अनेकदा आपल्या गर्लफ्रेंड आणि मुलांबरोबर फोटो शेअर करत असतो. त्याचे इन्स्टाग्रामवर २ मिलियन फॉलोअर्स आहेत. दरम्यान अर्जुनच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर तो 'क्रॅक - जी-तेगा तो जीतेगा!' चित्रपटामध्ये विद्युत जामवालबरोबर दिसला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर काही खास कामगिरी करू शकला नाही.

आता पुढं तो 'हरी हर वीरा मल्लू' या चित्रपटामध्ये पवण कल्याणबरोबर झळकणार आहे. सध्या हा चित्रपट खूप चर्चेत आहे. याशिवाय तो 'निकिता रॉय अ‍ॅन्ड द बुक ऑफ डार्कनेस'मध्ये सोनाक्षी सिन्हाबरोबर स्क्रिन शेअर करताना दिसेल.

# अभिनेता वरुण धवन झाला बाबा
## पत्नी नताशाने दिला गोंडस मुलीला जन्म





मुंबई -बॉलिवूड अभिनेता वरुण धवन आणि पत्नी नताशा दलाल यांना कन्यारत्नाचा लाभ झाला आहे. सोमवारी दुपारी नताशा दलाल हिला प्रसुती कळा सुरू झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर रात्री उशिरा वरुण धवन याचे वडील आणि दिग्दर्शक डेव्हिड धवन यांनी चाहत्यांसोबत गोड बातमी शेअर केली.वरुण धवनने ४ महिन्यांपूर्वी इंस्टाग्रामवर एक सुंदर फोटो शेअर केला होता. या ब्लॅक अँड व्हाइट फोटोमध्ये वरुण धवन त्याच्या पत्नीच्या बेबी बंपला किस करताना दिसत होता. लवकरच आम्ही पालक होणार असल्याची माहिती त्याने दिली. नताशाला ३ जून रोजी हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर संपूर्ण धवन कुटुंब हिंदुजा हॉस्पिटलबाहेर दिसले.

लग्नाच्या ३ वर्षानंतर वरुण धवन आणि नताशा दलाल यांनी एका चिमुकल्या परीचे स्वागत केले आहे. दोघांनी २४ जानेवारी २०२१ रोजी अलिबागमध्ये लग्न केले. नताशा आणि वरुण धवन हे शाळेपासूनचे मित्र होते. बऱ्याच कालावधीनंतर दिवसांनी दोघांनी मैत्रीचे नातं पुढे नेले आणि प्रेमाच्या नात्यात अडकले. काही वर्ष रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर दोघेही २०२१ मध्ये विवाहबद्ध झाले.

वरुण-नताशाची फिल्मी लव्हस्टोरी

बॉलिवूड अभिनेता वरुण धवन आणि फॅशन डिझायनर नताशा दलाल जानेवारी २०२१ मध्ये लग्नबंधनात अडकले आहेत. नताशा आणि वरुण लहानपणापासून एकमेकांचे चांगले मित्र होते. दोघांचे एकत्र शिक्षण झाले आहे. पुढे त्यांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झाले. वरुणने लग्नासाठी नताशाला अनेकदा विचारले. पण कायमच ती नकार देत होती. अखेर नताशाने होकार दिला. पुढे २४ जानेवारी २०२१ रोजी ते लग्नबंधनात अडकले. आता लग्नाच्या तीन वर्षांनी वरुण धवन बाबा होणार आहे. वरुण धवनच्या आगामी सिनेमांची प्रेक्षकांना उत्सुकता आहे.

# प्रश्न पर्यावरणाचा, प्रश्न अस्तित्वाचा

जागतिक पर्यावरण दिन हे औचित्य असले तरी या प्रश्नाची चर्चा उपलब्ध असणाऱ्या सगळ्या व्यासपीठांवरुन दररोज होणे आणि आवश्यक ती कृती करणे गरजेचे आहे. आता पर्यावरण विषयक प्रश्नांचे भयावह रुप अनुभवास येऊ लागले आहे. त्यामुळेच यापुढे तरी व्यक्तिगत पातळीवर कृतीशील होण्याखेरीज पर्याय उरलेला नाही.

दर वर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन' साजरा होतो. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र साजरीकरण संपल्यानंतर परिस्थिती पूर्ववत होते. नित्याचे उपक्रम पूर्वीच्याच टेचात सुरू होतात आणि प्रश्नाची तड न निघता दिवस पुढे सरत राहतात. खरे पाहता हा एक दिवस साजरा करावा असा विषयच आता राहिलेला नाही. पर्यावरण असंतुलनाचे घातक परिणाम आता तुमच्या आमच्या उंबऱ्यापर्यंत आले आहेत. त्याचे चटके आपल्याला भाजून काढू लागले आहेत.

इथे लक्षात घेण्याजोगी पहिली बाब म्हणजे पर्यावरणामध्ये प्रामुख्याने दोन घटक आहेत. पहिला निर्जीव तर दुसरा सजीव. सजीवांमध्येही वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्म जीव असे तीन घटक आहेत. माणूस हा प्राण्यांमधीलच एक घटक आहे. दुसऱ्या म्हणजेच निर्जीव घटकांबद्दल बोलायचे तर त्यात प्रामुख्याने हवा, पाणी, जमीन, प्रकाश, ऊर्जा वा अग्नी यांचा समावेश होतो. आपण याच घटकांना पंचमहाभूते असे म्हणतो, पण सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे सजीवांना जिवंत ठेवण्याचे काम हे निर्जीव घटक करत असतात. म्हणजेच सजीवांना सजीवांची गरज आहेच पण त्यांना निर्जीव घटकांची जास्त गरज आहे. हवा, पाणी, जमीन, ऊर्जा याशिवाज कोणताही सजीव जगू शकत नाही. मात्र असे असूनही माणसाने या सगळ्या निर्जीव घटकांचे प्रदूषण केले आहे. आज पर्यावरणामध्ये माणसाने निर्माण केलेली सर्वात मोठी समस्या याच प्रदूषणाची आहे. मग त्यात हवा, पाणी, जमिनीचे प्रदूषण अंतर्भूत आहेच, मात्र अलिकडे त्यात प्रकाशाचे प्रदूषणही मिसळले गेले आहे.

अशा सर्व प्रकारच्या प्रदूषणाला फक्त आणि फक्त माणूसच कारणीभूत आहे.

प्रदूषणामागील कारणांचा ढोबळमानाने विचार करायचा तर सर्वात मोठी समस्या वाढती लोकसंख्या हीच आहे. मात्र आज कोणीही याचा गांभीर्याने विचार करत नाही. लोकसंख्या वाढली की शहरीकरण वाढते आणि शहरीकरण वाढले की गरजाही वाढतात. पुढे हीच बाब वाढते औद्योगिकीकरण, वाढती वाहनसंख्या आणि वाढते विकासप्रकल्प यांना चालना देते. आज आपल्याला विकास हवा आहे. तोदेखील अत्यंत वेगाने हवा आहे. मात्र या हट्टापायीच आपण कमालीच्या वेगाने प्रदूषण वाढवले आहे.




भारताबाबत बोलायचे तर लोकसंख्या अमर्याद वाढत आहे. आज जगाची लोकसंख्या ८११ कोटीच्या घरात पोहोचली असून त्यात दर वर्षी नऊ ते दहा कोटींची वाढ होत आहे. भारताची लोकसंख्या १४२ कोटींच्या पलीकडे गेली असून आपण जगात सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश बनलो आहोत. मात्र नको त्या गोष्टीत आपण फार पुढे आहोत, याचा विचार कोणताही राजकीय पक्ष वा व्यक्ती करत नाही, ही दु:खाची बाब आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे लोकसंख्या वाढली की गरजा वाढू लागतात. पण गरजा वाढतात त्या प्रमाणात नैसर्गिक स्रोत वाढत नाहीत. त्याने दिलेली प्रत्येक गोष्ट मर्यादित आहे.

पूर्वी माणसाचे राहणीमान साधे होते. त्यातही खेड्यांमध्ये राहणाऱ्यांची संख्या जास्त होती. आता त्याच्या बरोबर उलटे सुरू आहे. शहरीकरणाचा वेग वाढल्यामुळे आता शहरांची संख्या वाढली नसली तरी व्याप्ती वाढली आहे. परिणामस्वरुप शहरांची अमर्यादित वाढ होत आहे. आज कोणतेही शहर बघा, हेच चित्र दिसते. याचा परिणाम म्हणून शहरा-शहरामध्ये अनेक मूलभूत आणि गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. कोणत्याही शहराला हवे तेवढे पाणी मिळत नाही. सहाजिकच त्यामुळे येणारा बकालपणा पर्यावरणाला अनेक प्रकारचे धोके निर्माण करताना दिसतो आहे. वाढते औद्योगिकीकरण ही पर्यावरण धोक्यात आणणारी आणखी एक महत्त्वाची बाब आहे. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर औद्योगिकीकरणाचा वेग वाढलाच पण जागतिकीकरणानंतर तो अधिक किंबहुना, प्रचंड प्रमाणात वाढला. सुखसोयी वाढवण्याकडे लोकांचा कल वाढला. सहाजिकच वाहनांची संख्या वाढली. आज जगभरातील वाहनांची संख्या १४७ कोटींच्या घरात पोहोचली आहे.

या सगळ्याबरोबर विकास प्रकल्पही वाढत आहेत. खरे तर गरजा मर्यादित ठेवणे गरजेचे आहे. मात्र ते होत नसल्याने अमर्यादित गरजा भागवण्यासाठी विकास प्रकल्प राबवणे गरजेचे झाले आहे. वाढत्या वाहनांना जागा करुन देण्यासाठी आपण रस्तेविकास प्रकल्प राबवत आहोत. वेगवेगळे धातू मिळवण्यासाठी खाणकाम प्रकल्प राबवत आहोत. ऊर्जा निर्माण करण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्प सुरू झाले. पण हे सगळे मिळवण्यासाठी आपण सभोवतालच्या जंगलाचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर विनाश सुरू केला. वृक्षतोड तर मोठ्या प्रमाणात आहे. संपूर्ण भारतात रस्ते विकास प्रकल्प राबवताना आजअखेरपर्यंत कोट्यवधी झाडे तोडली गेली आहेत आणि अजूनही हे प्रकल्प सुरूच आहेत. असे सगळे इतक्या वेगाने होत असेल तर निसर्ग आणि पर्यावरणाचा ऱ्हास होणे अटळ आहे. अर्थातच या ऱ्हासाचा वेगही प्रचंड आहे आणि हाच आज समस्त मानवजातीपुढचा यक्षप्रश्न आहे. आपल्या देशातच नव्हे तर जगभरात आत्तापर्यंत झालेल्या विकासाकडे बघता लक्षात येते की तो अशाश्वत आहे. म्हणजेच मानवनिर्मित विकास हा अक्षय नाही. खरे तर आपल्याला पर्यावरणपूरक विकासाची आवश्यकता आहे.

आता हवेच्या प्रदूषणाबद्दल बोलायचे तर यामुळे पर्यावरणाचे आत्यंतिक नुकसान झाले आहे, त्याला कारणीभूत असणाऱ्या घटकांची आधी चर्चा केलेलीच आहे. त्याच्या जोडीने अनेक चुकांमुळे हवेचे प्रदूषण वाढत आहे. जसे की, आपण वणवे लावतो. आगी लावतो. कचरा पेटवून देतो. पण यामुळेही हवेचे प्रदूषण होते, हे लक्षात घ्यायला हवे. अशा आगी वा वणवे अनेक दिवस धुमसत राहिल्याने त्यातून मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साईड बाहेर पडतो आणि मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होते. ते कमी करण्यासाठी शासनाने बरेच प्रयत्न केले. पण अद्याप त्याला हवे तेवढे यश आलेले नाही. कारण एकटे सरकार काहीही करु शकणार नाही. प्रत्येकाने व्यक्तिगत पातळीवर प्रदूषणकारक कृत्ये थांबवण्याखेरीज अपेक्षित निकाल मिळणे अशक्य आहे. आज शहरांमध्ये सगळा कचरा पेटवला जातो.


त्यामुळे हवेचे प्रदूषण वाढते.

हवेच्या दृष्टीने बघता जगभरात ८६० ते ९०० शहरे अतिप्रदूषित मानली गेली असून या यादीत भारतातील तब्बल ४० शहरांचा समावेश आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर त्यात मुंबई, चंद्रपूर, नागपूर, नवी मुंबई, कोल्हापूर आदी शहरांचा समावेश आहे. ही आकडेवारी परिस्थितीचे गांभीर्य दर्शवण्यास पुरेशी आहे, असे म्हणता येईल. केवळ भारताचा विचार केला तर हवेच्या प्रदूषणामुळे दर वर्षी एक लाख वीस हजारांपेक्षा अधिक लोक श्वसनाच्या विकारामुळे मृत्युमुखी पडतात. मात्र हे सगळे माहीत असूनही आपण प्रदूषण थांबवलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

हा झाला प्रदूषणाचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम. पर्यावरणावर होणारा परिणाम तर त्यापेक्षाही भयावह आहे. हवेच्या वाढत्या प्रदूषणामुळे माणसाने निर्माण केलेली सर्वात मोठी समस्या जागतिक तापमानवाढ आणि बदलत्या हवामानाची आहे. यामुळे अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ते सोडवण्यासाठी जागतिक पातळीवर अनेक राष्ट्रांचे प्रमुख एकत्र येतात, पण कोणीही कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्याचा मुद्दा समोर मांडत नाही वा त्या दृष्टीने प्रयत्नही करताना दिसत नाही. म्हणूनच यंदाचा पर्यावरणदिन साजरा करताना तरी गांभीर्य ओळखून हा प्रश्न धसास लावण्यासाठी प्रयास केले जावे. ते झाले नाही, तर येणारा काळ अत्यंत त्रासदायक असेल, हे नक्की.

-डॉ. मधुकर बाचुलकर, ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# डॉ.नागनाथ मोटे: संस्कार व सेवेचा वसा

मराठवाडा प्रांताला शिक्षण फार उशिरा मिळाले. स्वातंत्र्यानंतर तेरा वर्षांनी संयुक्त महाराष्ट्रात मराठवाडा सामील झाल्यानंतर मराठवाड्यात सार्वत्रिक शिक्षणाला सुरुवात झाली.

या अगोदर निजाम काळात हैदराबाद, औरंगाबाद आणि जिल्ह्याच्या ठिकाणी हायस्कूल असत.या शाळेत शिक्षण घेणारा वर्ग श्रीमंत व उच्चवर्णीय होता. सर्व सामान्य माणसाला शिक्षण घेणे हे दुरापास्त होते. पण संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा.यशवंतराव चव्हाणांनी शिक्षणाचा विस्तार आणि ईबीसीची सवलत लागू केल्यामुळे खेड्यापाड्यातील मुलं शिक्षणाकडे वळू लागली. प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे सरांचा जन्मही याच काळातला असून,शिक्षणाची हेळसांड त्यांच्याही वाट्याला आली आहे. १९४८ ला मराठवाडा स्वतंत्र झाला, पण येथे शैक्षणिक सोयी शून्य होत्या.म्हणून शाळेत जावे,शिक्षण घ्यावे हा विचारच समाजाच्या ध्यानीमनी नव्हता. १९५२ नंतर सरकारने शिक्षणाला प्राधान्य दिले. मोठ्या लोकसंख्येच्या गावी शाळा सुरू केल्या.या धोरणातून आष्टा कासार या गावी शाळा उघडण्यात आली. पण कुणाचे मार्गदर्शन नाही. गावात शाळा आहे म्हणून वडिलांनी वयाच्या दहाव्या वर्षी शाळेत दाखल केले.

प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे यांचा जन्म धाराशिव जिल्ह्या लोहारा तालुक्यातील आष्टा कासार या गावी शेतकरी-शेतमजूर कुटुंबात झाला. घरची परिस्थिती अत्यंत बेताची होती. कष्टाशिवाय रोजचे भागत नव्हते. अशा कठीण परिस्थितीतून पहिली ते दहावीचे शिक्षण त्यांनी आष्टा कासार येथे तर बी.एस्सी.दयानंद महाविद्यालय सोलापूर येथून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.एम.एस्सी व पीएच. डी.रसायनशास्त्रात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून पूर्ण केले.

प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे सरांचे कार्य व कर्तृत्त्व फार मोठे आहे. त्यांच्या कार्याला शैक्षणिक गुणवत्ता व सामाजिकतेचे भान आहे.अहमदपूर येथे रसायनशास्त्राचे प्राध्यापक, प्राचार्य व नांदेड येथे नव्याने स्थापन झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात संचालक विद्यार्थी कल्याण, समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना, परीक्षा नियंत्रक आणि कुलसचिव अशा पदांवर काम करताना त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. ते उर्जेस्व व्यक्तीमत्त्वाचे धनी आहेत. सतत कार्यरत रहाणे त्यांना आवडते.जवळपास दोन दशकांपासून त्यांच्या सहवासात मी वावरतो आहे. त्यांच्याकडे कामाची प्रचंड ऊर्जा आहे. एखादी जबाबदारी स्वीकारली की,ती नियोजनबद्ध, परिश्रमपूर्वक व अचूकपणे पूर्ण करणे हा त्यांचा स्वभाव आहे. स्वभावने शांत, संयमी व मृदूभाषी डॉ.मोटे सर मुळातच उपक्रमशील व सृजनशील वृत्तीचे असून मूलभूत कार्याला वाहून घेणे त्यांना आवडते आहे.

अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयाच्या लौकिकात भर घालण्यात ज्यामध्ये पाच-सहा प्राध्यापकांच्या मध्ये डॉ. मोटे सरांचा सहभाग आहे. अध्ययन आणि अध्यापनाबरोबर महाविद्यालयातील मराष्ट्रीय सेवा योजनाफ हा विभाग त्यांनी अनेक वर्षे सांभाळून या विभागाची ओळख विद्यापीठ आणि भारत सरकारपर्यंत पोहचवली. राष्ट्रीय सेवा योजनेत त्यांनी स्वतःला झोकून दिले. सामाजिक सेवेचा वसा त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच राजर्षी शाहू महाराज,म.जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,महर्षी शिंदे, महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण या महापुरुषांच्या चरित्र वाचनातून स्वतः मध्ये प्रभावित केला होता. यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रमाधिकारी म्हणून काम करताना ठराविक काम त्यांनी केले नाही. विद्यार्थ्यांच्या गरजेची व परिसराच्या हिताची कामं केली.दर रविवारी स्वच्छता अभियान, विज्ञान यात्रा, अंधश्रद्धा निर्मूलन किंवा विविध विषयांवर व्याख्यानाचे आयोजन करून विद्यार्थ्यांची जडणघडण केली. महात्मा गांधी यांच्यावर अभ्यासू वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली.यामुळे सरांचा मृदूभाषी स्वभाव असूनही महाविद्यालयात ते सर्वांच्या परिचयाचे होत. अहमदपूर तालुक्यात अनेक गावांत त्यांनी घेतलेली राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरे ही आजही लोकांच्या स्मरणात आहेत. खेड्यापाड्यातील लोकांना स्वच्छता, अतिक्रमण, अंधश्रद्धा, वाईट रुढी-प्रथा-परंपरा आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून देत. शिबिर काळात त्या गावाशी आपुलकीचे नाते निर्माण होत असे,यामुळे शिबीर संपल्यानंतरही त्या गावचे लोक त्यांना भेटायला येत असत.काही गावांमध्ये त्यांची ट्रकमधून मिरवणूक काढण्यात आली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामातून क्रांतिकारक बदल घडवून आणले आहेत.रासेयो विभागाला समाजसेवेचे व्रत दिले होते.ते सतरा वर्ष कार्यक्रमाधिकारी होते,त्यापैकी अकरा वेळा त्यांनी स्वतः रक्तदान केले आहे. याशिवाय अहमदपूर परिसरातील गोरगरीब जनतेची परिस्थिती ओळखून सर्व रोग निदान व उपचार आरोग्य शिबिराचे आयोजित केले. या शिबिरातून दहा हजार लोकांनी सेवा घेतली. यावेळी १६३ शस्त्रक्रिया, ५१० कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सात दिवस या सर्व पेशंटची राहणे आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग फक्त नेमून दिलेल्या कामासाठीच कार्यरत असतो, असे नसून त्या परिसराचा गरजा ओळखून काही नवनवीन कामाची आखणी करणे आवश्यक असते हा विचार त्यांनी या कामातून दिला आहे. यामुळे त्यांची राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा व विद्यापीठ समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली.अशा विद्यार्थी व लोकोपयोगी कार्यामुळे १९९६ मध्ये राज्य शासनाच्या सर्वोत्कृष्ट समन्वयक पुरस्कार प्रदान करण्यात आला.



महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणूनही सरांचे कार्य उल्लेखनीय आहे. प्राचार्य ढोबळे सरांनी महात्मा गांधी महाविद्यालय शैक्षणिक पॅटर्न म्हणून लौकिक केला होता. हा शैक्षणिक पॅटर्नचा लौकिक संस्था, प्राध्यापकांच्या सहकार्याने मोटे यांनी टिकवून ठेवला. गुणवत्ता उपक्रमशीलता आणि नावीन्यता ही त्यांच्या प्रशासनिक कार्याची ओळख आहे. महात्मा गांधी महाविद्यालयाचा मपथिकफ वार्षिक अंकाला एक दर्जा मिळवून दिला. समकालीन व सामाजिक प्रश्नांचे भान विद्यार्थ्यांना असले पाहिजे. प्रगल्भ वाचन, चिंतनातून विद्यार्थ्यांला लेखनाकडे वळविले पाहिजे या जाणिवेतून त्यांनी दुष्काळ, समाज व स्त्रियांचे प्रश्न,मराठवाडा विकासाचे प्रश्न, स्वामी रामानंद तीर्थ, हैदराबाद मुक्तिसंग्राम, आमची शेती आमचा शेतकरी असे एकावर्षी एक विषय देऊन हा अंक प्रकाशित केला. विषयाचे वेगळेपण आणि विद्यार्थ्यांच्या प्रगल्म चिंतनामुळे मपथिकफ अंकाला विद्यापीठाकडून अनेक वर्षी पुरस्कार प्राप्त झाले. प्राध्यापक-प्राचार्य हेच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचे खरे गुरु असतात. हे काम डॉ. मोटे सरांनी परिश्रमपूर्वक केलेले आहे. अत्यंत शांतपणे स्वतः काम करणे आणि विद्यार्थी,सहकार्याकडून काम करवून घेणे आणि कामाचे उद्दिष्ट गाठणे हे डॉ. नागनाथ मोटे सरांच्या कामाचे स्वरूप आहे.

रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून डॉ.मोटे सरांचे योगदान आहे. बी.एस्सी व एम.एस्सी विद्यार्थी काळात रसायनशास्त्रात विशेष प्राविण्य मिळवले आहे. १९८१ ला पंतप्रधान मा. इंदिरा गांधी यांच्या हस्ते बनारस विद्यापीठात अखिल भारतीय विज्ञान अधिवेशनात मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत तरुण संशोधक म्हणून त्यांची निवड झाली आहे. रसायनशास्त्र विषयाच्या संशोधनात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

१७ सप्टेंबर १९९५ ला नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ व विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांची निवड झाली. नव्याने स्थापन झालेल्या विद्यापीठात काम करणे हे एक आव्हान असते. जुने शैक्षणिक प्रारूप बदलून नवीन शैक्षणिक प्रारूप त्या प्रदेशानुरूप निर्माण करण्याचे आव्हान असते. हे आव्हान कुलगुरू म्हणून डॉ. वाघमारे सरांनी स्वीकारले होते. यासाठी त्यांना कार्यतत्पर,विश्वासू, नि:स्वार्थी आणि अनुभवी प्राध्यापकांची गरज होती. हे ओळखून कुलगुरू डॉ.वाघमारे सरांनी डॉ. नागनाथ मोटे सरांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अनेक पदांवर निवड केली.हा मोटे सरांच्या कार्याचा गौरव व व्यक्तीमत्त्वाचा सन्मान आहे.नांदेड विद्यापीठाच्या उभारणीत डॉ.नागनाथ मोटे सरांचे योगदान आहे.१६ मे १९९५ ते ३० जून १९९९ या कालावधीत संचालक विद्यार्थी कल्याण, संचालक व समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना, संचालक प्रभारी परीक्षण नियंत्रक, विशेष कार्यासन अधिकारी (शैक्षणिक) व कुलसचिव या विविध पदांवर काम करून या पदाची कार्य संहिता त्यांनी घालून दिली. विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक म्हणून काम करीत असताना या विभागाची पूर्ण संहिता तयार करून उत्कृष्ट संयोजनाने युवक महोत्सवाचे आयोजन केले. हे करीत असताना महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठातील युवक महोत्सवाची संहिता आणि नांदेड विद्यापीठाच्या युवक महोत्सवाची संहिता ही विद्यार्थी केंद्री असल्याची आपणास दिसते. युवक महोत्सवातील विविध कला प्रकारांची संहिता,पारंपरिक स्वरूप, सादरीकरण, सहभाग,संगीत,वेळ आणि प्रदेशानुसार कला प्रकारांचा समावेश त्यांनी स्वतः लक्ष घालून केले आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक म्हणून त्यांचे कार्य खूपच महत्त्वपूर्ण आहे. कुलगुरू म्हणून डॉ. जनार्दन वाघमारे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामाला एक विधायक दृष्टी दिली आहे. शिक्षण, संशोधन आणि ज्ञानाचे उपयोजन हे विद्यापीठाकडून सतत घडत असते. पण विद्यापीठाला संधी मिळाली तर त्यांनी सामाजिक जीवनात आदर्श कामही केले पाहिजे.या जाणिवेतून लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त भागात जातिपतीविरहित आदर्श राष्ट्रीय सेवाग्राम उभे करण्याची संकल्पना कुलगुरू डॉ.जनार्दन वाघमारे सरांच्या मनात आली.त्यावर विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेसमोर चर्चा करून ठराव पास केला. हे मराष्ट्रीय सेवाग्रामम प्रकल्प यशस्वी पूर्ण करण्यात डॉ.मोटे सरांचे मोठे योगदान आहे. भूकंपग्रस्त गावापैकी चलबुर्गा या गावची निवड जिल्हाधिकारी,गावातील नागरिक यांच्या सहकार्याने जातीपातिविरहित मराष्ट्रीय सेवाग्रामम म्हणून निवड करण्यात आली.

राष्ट्रीय सेवाग्राम ही आदर्श गावाची संकल्पना आहे. समता, श्रमप्रतिष्ठा आणि सोहार्दाचे प्रतीक म्हणजे राष्ट्रीय सेवाग्राम आहे. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांपर्यंत जातीपातिविरहित आदर्श गाव देशात कुठेच नव्हते.संविधानाच्या मूल्यांप्रमाणे संधी मिळेल तेथे निजाती गावांची आखणी केली पाहिजे. म्हणून विधायक आणि कल्पक विचारातून मराष्ट्रीय सेवाग्रामम निर्मिती करण्यात आली. जाती, धर्मातील संकुचित विचार मोडीत काढून गावांमधील सवर्ण, दलित,मुस्लिम आणि इतर मागासवर्गीय यांच्या घराच्या भिंती एकमेकांना चिकटून असावी ही खरी संकल्पना आहे. जातीपातिच्या भिंती नसलेले चलबुर्गा गाव मराष्ट्रीय सेवाग्रामम म्हणून प्रसिद्ध केले. सेवाग्राम उभारणी करताना रासेयोच्या विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून झाली आहे. १५० युवतीचे मनेतृत्त्व विकास शिबिरफ व ११० मयुवकांचे राष्ट्रीय एकात्मता शिबिरफचलबुर्गा या ठिकाणी घेण्यात आले. या शिबिरार्थी विद्यार्थ्यांच्या शिवाय आठ प्रमुख राज्यातील मराष्ट्रीय एकात्मता शिबिरफ दि.१० ते २८ फेब्रुवारी १९९९ ला आयोजित केले. या शिबिरात मध्यप्रदेश, गुजरात, आंध्रप्रदेश, ओरिसा, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू आणि महाराष्ट्र या राज्यातील विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांनी श्रम सेवा दिली आहे. राष्ट्रीय सेवाग्राम हे मानवतेचे मंदिर असून या एका गावामध्ये संपूर्ण भारताचे दर्शन घडते,अशा प्रकारच्या प्रतिक्रिया या परराज्यातील विद्यार्थ्यांनी आवर्जून इथे नोंदविलेल्या आहेत. राष्ट्रीय सेवाग्राम उभे करताना समन्वयक म्हणून डॉ. नागनाथ मोटे सरांचे काम गौरवास्पद आणि अभिमानास्पद असे आहे.अत्यंत चिकाटीने, सचोटीने सर्व विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन,त्यांचा उत्साह वाढवून, त्यांना सोबत घेऊन, त्यांची सर्व काळजी घेऊन चलबुर्गा गावी मराष्ट्रीय सेवाग्रामम त्यांनी उभे केले. डॉ. जनार्दन वाघमारे सरांनी डॉ.मोटे सरांची रासेयो समन्वयक म्हणून केलेली निवड सार्थ ठरली. डॉ.मोटे सरांचे कार्य इथेच थांबत नाही,तर त्यांनी मराष्ट्रीय सेवा योजनाफ या विषयावर तीन विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.पदवी मिळाली आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेमधून काम करताना श्रममूल्यांला संशोधनाचा आधार दिला आहे.

प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून काम करताना मराठवाडा विद्यापीठात ५० टक्के एटी-केटीची पध्दत होती. ती बंद करून २५ टक्के करण्यात आली.हे करताना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गाठीभेटी घेणे, संवाद साधणे.२५ टक्के एटी-केटी व कॉपीमुक्त परीक्षा पध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विकास होणार आहे असे विद्यार्थ्यांना पटवून दिले. ३२ पृष्ठांची उत्तर पत्रिका व पुरवणी प्रकार बंद करून परीक्षेतील गैरप्रकारावर पायबंध घालण्यात आले. शैक्षणिक, सामाजिक, संशोधनात्मक आणि नवनवीन कामामुळे त्यांना वेळोवेळी अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. केंद्रीय क्रीडामंत्री सुखदेवसिंग धिंडसा यांच्या हस्ते श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयातून ३६ वर्षाच्या सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाले आहेत. परंतु सेवानिवृत्तीनंतर ही त्यांचे सामाजिक कार्य थांबलेले नाही.विद्यार्थी सहाय्यता मंडळ लातूर, यशवंतराव चव्हाण लोकविकास प्रतिष्ठान व राष्ट्रीय सेवा ग्राम प्रतिष्ठान औसा या तिन्ही संस्थेचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. संस्कार व सेवेचा वसा अखंडित आहे.

******

**-डॉ.जयद्रथ जाधव**

अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूर.

भ्रमणभाष, ८२८५४७४७७७

## ५२ पत्ते

५२ पत्ते बद्दल आजवर वाईट किंवा फारतर टाईमपास एवढेच आपण सर्वांनी ऐकले किंवा पाहिले असेल पण ही खालील माहिती नक्की वाचा पत्त्यांचा खेळ म्हटला की तो जुगाराचा खेळ वाटतो आणि खेळणारा जुगारी वाटतो ह्या पलीकडे आपल्या कडे माहीती नाही. पत्त्यांविषयी जाणून घेऊ.

पत्ते हे सामान्यतः आयताकृती पातळ पुठ्याचे किंवा प्लॅस्टिक चे बनविलेले असतात.

बदाम, इस्पिक, किलवर (किल्वर) आणि चौकट. या चार प्रकारात प्रत्येकी १३ पत्ते मिळून ५२ पत्याचा संच होतो.

पत्याची विभागणी एक्का, दुर्री, तिर्री, या क्रमाने दशी पर्यन्त, गुलाम, राणी, राजा याशिवाय २ जोकर असतात.

१) ५२ पत्ते म्हणजे ५२ आठवडे
२) ४ प्रकारचे पत्ते म्हणजे ४ ऋतु. प्रत्येक ऋतू चे १३ आठवडे.
३) या सर्व पत्त्याची बेरीज ३६४
४) एक जोकर धरला तर ३६५ म्हणजे १ वर्ष.
५) २ जोकर धरले तर ३६६ म्हणजे लीप वर्ष.
६) ५२ पत्यातील १२ चित्र पत्ते, म्हणजे १२ महिने
७) लाल आणि काळा रंग म्हणजे दिवस आणि रात्र.

पत्त्यांचा अर्थ समजून घेऊ
१) दुर्री म्हणजे पृथ्वी आणि आकाश, २) तिर्री म्हणजे ब्रम्हा,विष्णू आणि महेश
३) चौकी म्हणजे चार वेद (अथर्ववेद, सामवेद,ऋग्वेद, यजुर्वेवेद)
४) पंजी म्हणजे पंच प्राण (प्राण, अपान, व्यान, उदान ,समान) ५) छक्की म्हणजे षड रिपू (काम ,क्रोध,मद,मोह, मत्सर, लोभ)
६) सत्ती- सात सागर
७) अटठी- आठ सिद्धी
८) नववी- नऊ ग्रह
९) दसशी- दहा इंद्रिये
१०) गुलाम- मनातील वासना
११) राणी- माया
१२) राजा-सर्वांचा शासक
१३) एक्का- मनुष्याचा विवेक आणि समोरचा भिडू -

प्रारब्ध मित्रांनो, लहानपणा पासून पत्ते बघीतले असतील काहींनी खेळले असतील परंतू त्या पत्त्यांच्या संचा बद्दल माहीती होती का ? त्याचे उत्तर बहुदा नाहीच असेल. आहे ना गंमतीशीर आणि ज्ञानदायी. पत्त्याचा डाव खेळताना आयुष्याच्या डावाचा अर्थ समजून घेतला तर जगणे नक्कीच सोपे होऊ शकते!!

**- सौ. शीला राजेंद्र लटंगे**
डिकसाळ, कळंब.

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.३०/०५/२०२४

ज्याअर्थी अर्जदार श्री सुर्यकांत तुकाराम थोटे रा. सुशिलादेवी देशमुख नगर लातूर ता. लातूर यांची आई नामे सुभद्राबाई तूकाराम थोटे यांचा मृत्यु दिनांक १६/१२/२०१६ रोजी मौजे गुंडसूर ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार यांनी त्यांची आई यांचा मृत्यु दिनांक १६/१२/२०१६ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २९/०५/२०२४. रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांची आई यांचा मृत्यु दिनांक १६/१२/२०१६ रोजी मौजे गुडसूर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार श्री सुर्यकांत तुकाराम थोटे रा.सुशिलादेवी देशमुख नगर लातूर ता.लातूर यांची आई नामे सुभद्राबाई तुकाराम थोटे यांचा मृत्यु दिनांक १६/१२/२०१६ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय गुड्सूर ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. आज दिनांक ३०/०५/२०२४ रोजी दिले मृत्यु

पूढे नेमलेली तारीख ३०/०६/२०२४ sd

- तालूकां दंडाधिकारी तथा,
तहसीलदार उदगीर

## वर्षा ऋतूच्या शुभेच्छा

आज सूर्याचा मृग नक्षत्रात प्रवेश.
काले वर्षतु पर्जन्य: पृथिवी सस्यशालिनी।
देशोऽयं क्षोभरहित: सज्जना: सन्तु निर्भया:।।
भावार्थ :- हे देवा, पर्जन्यवृष्टी योग्य वेळी होवो, पृथ्वी धनधान्यांनी संपन्न होवो, या देशात क्षोभ निर्माण न होवो आणि सज्जनांना कुणापासूनही भय प्राप्त न होवो.

**- सौजन्य - जयत डिकले**

# विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील वैज्ञानिकांचे कार्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी: डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे

लातूर: येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०८ जून २०२४ रोजी वैज्ञानिक 'टीम बर्नर्स ली' यांचा ६९ वा वाढदिवस तसेच 'फ्रान्सिस क्रिक' यांची ८८ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम महाविद्यालय आपले कर्तव्य मानून राबवत आहे.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिकांच्या जीवनकार्याची माहिती मिळावी व त्यातून यशस्वी जीवनाचा मूलमंत्र विद्यार्थ्यांनी अवलंबून त्यासाठी नेहमी संयम, दृढनिश्चय आणि सातत्य या वैज्ञानिकांच्या कार्यांचा आदर्श घेऊन अभ्यास करावा असे मत उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे व उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.प्रा.डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.टीम बर्नर्स ली व फ्रान्सिस क्रिक यांच्याबद्दल जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी जानवी अंबर व पर्णवी ढवारे यांनी अनुक्रमे दिली.

सर टीम बर्नर्स-ली हे जागतिक माहितीजालाचे जनक आहेत. ज्यांच्या दूरदर्शी आणि नाविन्यपूर्ण कार्याने आपल्या जीवनातील जवळजवळ प्रत्येक पैलू बदलले आहेत. वर्ल्ड वाईड वेबचे शोधक आणि टाईम मॅगझिनच्या '२० व्या शतकातील १०० सर्वात महत्त्वाचे लोक', सर टिम बर्नर्स-ली हे एक वैज्ञानिक असून युरोपीयन नाभिकीय संशोधन संस्थेत (सर्न) त्यांनी २५ डिसेंबर १९९० रोजी क्लायन्ट सर्वर संवादाचा जागतिक माहितीजालाच्या सुरळीत कार्यासाठी आवश्यक असणारा घटक प्रयोग यशस्वी करून दाखविला.ते सध्या वर्ल्ड वाईड वेब कोन्सोर्टीयमचे निर्देशक आणि एम आय टी संगणकशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळेत ३ कौम संस्थापक प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

फ्रान्सिस क्रिक (१९१६-२००४) हे ब्रिटनच्या महान शास्त्रज्ञांपैकी एक होते.जेम्स वॉटसन सोबतच्या कामासाठी ते प्रसिद्ध होते, ज्यामुळे १९५३ मध्ये डीएनएच्या संरचनेची ओळख पटली, मॉरिस विल्किन्स, रोझलिंड फ्रँकलिन आणि इतरांच्या कामावर चित्र काढले. वॉटसन आणि क्रिक हे डीएनएचे शोधक नव्हते, तर या रेणूच्या जटिल, दुहेरी-हेलिकल रचनेचे ज्याने डीएनएची त्रिमितीय रचना दुहेरी हेलिक्स असल्याचे निर्धारित केलेले शास्त्रज्ञ होते . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात वरिष्ठ महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. सी.एस.स्वामी,रसायनशास्त्र विभागातील प्रा.राहुल जाधव,भौतिकशास्त्र विभागातील डॉ.शंकर बिराजदार आणि जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.अवंती बिडकर, वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा.विद्या हवालदार तसेच सतिश तांदळे,विनोद घार,सुदाम सातपुते,कुलकर्णी,अमोल क्षीरसागर,बाळू चौगुले,पूजा सूर्यवंशी,बाबासाहेब बचाटे, तेजस काळे व अश्रिवनी ढवारे यांची उपस्थिती होती.








उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# सामाजिक एकतेतून समृद्ध गाव निर्मितीसाठी विधिदुत प्रशिक्षण महत्त्वाचे - डॉ. कल्लशेटी

तुळजापूर दि.८ (प्रतिनिधी) - न्याय विभाग, भारत सरकारच्या दिशा उपक्रमांतर्गत यशदा पुणे व टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विधिदुत कायदेशीर साक्षरता आणि जागरूकता प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उदघाटक व मार्गदर्शक म्हणून यशदा पुणेचे उपमहासंचालक डॉ मल्लिनाथ कल्लशेटी हे उपस्थित होते. याप्रसंगी, श्रीमती प्रांजल शिंदे, प्रकल्प संचालिका, डीआरडीए, डॉ आर व्ही पोले, प्रशिक्षण व्यवस्थापक, यशदा, पुणे, गटविकास अधिकारी श्री अमोल ताकभाते, टीसचे डॉ संपत काळे, सहयोगी अधिष्ठाता, श्री गणेश चादरे, प्रशिक्षण व्यवस्थापक, श्री. देविदास कदम, प्रशासकीय अधिकारी, श्री. दत्तात्रय घोडके विधीज्ञ, श्री. शंकर ठाकरे, श्री. आनंद भालेराव सामाजिक कार्यकर्ता, श्रीमती निता मगर त्याच बरोबर सरपंच, उप सरपंच, सदस्य, तंटामुक्त समिती अध्यक्ष, बाल संरक्षण समिती अध्यक्ष व उमेद सीआरपी आदी मान्यवर उपस्थित होते. वृक्षाच्या रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

या प्रसंगी, डॉ मल्लिनाथ कल्लशेटी म्हणाले की, शाश्र्वत विकासाच्या १७ उद्दिष्टांच्या माध्यमातून समृद्ध गाव निर्मितीसाठी गावातील सामाजिक एकता व बंधुभाव अखंडीत ठेवण्यासाठी विधिदुत प्रशिक्षण महत्वपुर्ण असून भविष्यात विधिदुतांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग गाव विकासासाठी करावा असे आवाहन केले.

याप्रसंगी, टीसचे डॉ संपत काळे म्हणाले की, विधिदुत प्रशिक्षण कार्यक्रम हा विधिदुतांनी काम करताना येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी व त्यामाध्यमातून गाव विकासाला एक नवीन दिशा देण्यामध्ये उपयोगी असल्याचे सांगितले.

याप्रसंगी, न्याय विभाग भारत सरकारच्या, दिशा उपक्रम प्रशिक्षण समन्वयक श्रीमती महिमा शर्मा, यांनी देशात राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाची व आकांक्षित जिल्हयामध्ये विधी साक्षरता व जागरूकतेचे महत्व या विषयावर ऑनलाइन स्वरूपात मार्गदर्शन केले.

श्रीमती प्रांजल शिंदे म्हणाल्या की, उमेद अंतर्गत काम करणाऱ्या सीआरपी, बचत गटातील महिलांच्या कार्यक्षमता वाढीसाठी अत्यंत महत्वाचे असून या महत्वपूर्ण प्रशिक्षणाचा उपयोग उमेद अंतर्गत कार्य करणाऱ्या सर्व महिला यामध्ये महत्वाची भूमिका बजावतील असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. तर विधीज्ञ दत्तात्रय घोडके यांनी भारतीय संविधान मूलभूत हक्क व कर्तव्य या विषयावर व टीसचे गणेश चादरे यांनी मोफत सक्तीचे शिक्षण कायदा २००९, बाल विवाह प्रतिबंध कायदा २००६ व रॅगिंग कायदा २००९ या विषयांवर तर डॉ. कार्तिक यादव यांनी गर्भलिंग प्रसूती निदान प्रतिबंध कायदा १९९४ या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशदा, पुणेचे प्रशिक्षण व्यवस्थापक आर व्ही पोले यांनी तर सूत्रसंचालन आनंद भालेराव यांनी व आभार निता मगर यांनी मानले.



पान १ वरून

## नरेंद्र मोदी....

आरएलडी - जयंत चौधरी
एलजेपी - चिराग पासवान
जेडीएस - कुमारस्वामी
टीडीपी - राम मोहन नायडू, के रविंद्र कुमार
एनसीपी - प्रफुल्ल पटेल
आजसू - चंद्र प्रकाश चौधरी
अपना दल सोनेलाल - अनुप्रिया पटेल
जेडीयू - रामनाथ ठाकूर, दिलावर कामत, ललन सिंह
शिवसेना - श्रीकांत शिंदे किंवा प्रतापराव जाधव

टेस्लाच्या मस्क यांच्याकडून नरेंद्र मोदींचे अभिनंदन

प्रसिद्ध इलेक्ट्रिक कार उत्पादक टेस्ला कंपनीचे सीईओ तथा दिग्गज उद्योगपती इलॉन मस्क यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लोकसभा निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन केले. तसेच, आपल्या कंपन्या भारतात काम करण्यास उत्सुक असल्याचे मस्क यांनी म्हटले आहे. नरेंद्र मोदी, जगातील सर्वात मोठ्या लोकशाही निवडणुकीत आपल्या विजयाबद्दल अभिनंदन. माझ्या कंपन्या भारतात काम करण्यास उत्सुक आहेत, असे मस्क यांनी सोशल मीडिया पोस्ट करत म्हटले आहे. महत्वाचे म्हणजे, निवडणुकीपूर्वी, मस्क यांनी भारत दौऱ्यावर येण्याचे ठरवले होते. मात्र, नतंर त्यांनी हा दौरा रद्द केला होता.

नितीशकुमारांना होती पंतप्रधानपदाची ऑफर

सरकार स्थापन करण्यासाठी भाजप विरोधी इंडिया आघाडीनेही प्रयत्न केले होते. त्यांनी बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल (संयुक्त) (जेडीयू)चे प्रमुख नितीश कुमार यांना थेट पंतप्रधानपदाची ऑफर दिली होती, असा दावा जनता दल संयुक्त (जेडीयू) चे नेते के. सी. त्यागी यांनी एका वृत्तवाहिनेला दिलेल्या मुलाखतीत केला आहे.

## एक्झिट...

कोसळला, परिणामी सामान्य गुंतवणूकदारांचे ३१ लाख कोटी रुपयांचे मोठे नुकसान झाले. वकील वरुण ठाकूर यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेल्या याचिकेत दावा करण्यात आला आहे की, या ३१ लाख कोटी रुपयांच्या तोट्यामुळे बाजारातील मंदीचा परिणाम एकूण भारतीय अर्थव्यवस्थेवर होईल आणि जागतिक स्तरावर भारताच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचेल.

याचिकेत सीबीआय, ईडी, सीबीडीटी, सेबी आणि एसएफआयओ कडून ॲक्सिस माय इंडिया, इंडिया टुडे मीडिया प्लेक्स, टाइम्स नाऊ, इंडिपेंडेंट न्यूज सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड (इंडिया टीव्ही), एबीपी न्यूज प्रायव्हेट लिमिटेड, रिपब्लिक मीडिया नेटवर्क, न्यूज नॅशनल नेटवर्क प्रायव्हेट लिमिटेड, टीव्ही९ भारतवर्ष आणि एनडीटीव्ही यांच्या विरोधात चौकशीची मागणी करण्यात आली आहे. त्यांनी दावा केला की एक्झिट पोल भारतीय निवडणूक आयोगाने जारी केलेल्या लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम १२६ अ आणि २ एप्रिल २०२४ च्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करत आहे.

## मी पळणारा...

वाटा उचलला होता तो आता आपण उचलला नाही. आता आपल्याला पुन्हा एकदा रणनीती ठरवता यावी यासाठी आजची बैठक आहे. पराभवाची कारणे शोधून ती कशी दूर करता येईल यासाठी आज निर्धार केला. उन्हाळा संपत आहे काहीली पण संपत आहे. पावसाळा जवळ आला आहे. पाऊस पडताना जे पेरलं जातं ते उगवतं. आपण नव्याने पेरण्याची वेळ आलेली आहे, असं फडणवीस म्हणाले.

मला मोकळं करुन काम करायची संधी द्या

भाजपचे नेतृत्व मी करत असल्याने मी म्हटले की या अपयशाची जबाबदारी माझी आहे. मी दोन्ही अध्यक्ष यांचे आभार मानतो. अर्थ मॅटिकमध्ये आपण कमी पडलो. मी म्हणालो की मला काम करण्याची संधी द्या. या निवडणुकीमध्ये भाजपचे नेतृत्व मी करत असल्यामुळे अपयशाची जबाबदारी माझ्यावर आहे. राजकीय गणितात आम्ही कमी पडलो. मी पक्षाच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करेन. सर्वांनी अतिशय चांगलं काम केलं. मला मोकळं करुन काम करायची संधी द्या, असंही देवेंद्र फडणीस म्हणाले.

## ठाकरे गटात...

नरेंद्र मोदी यांना पाठिंबा देतो, असे सांगितले आहे. मुल्ला-मौलवींना पैसे देऊन मतं मिळवण्याची उद्धव ठाकरेंची भूमिका आम्हाला पटलेली नाही, असे या खासदारांनी आम्हाला सांगितले. मात्र, पक्षांतर केल्यास अपात्रतेची कारवाई होऊ शकते. पक्षांतरबंदी कायद्यातंर्गत कारवाईचा धोका टाळण्यासाठी या दोन खासदारांनी प्लॅनही आखला आहे. आम्ही सहा खासदारांची संख्या जमवतो आणि लवकरात लवकर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली मोदी साहेबांना पाठिंबा देऊ, असे या दोन खासदारांचे म्हणणे असल्याचा दावा नरेश म्हस्के यांनी केला आहे.

नरेश म्हस्के यांच्या या दाव्यामुळे ठाकरे गटात मोठी खळबळ उडाली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर शिंदे गटातील अनेक आमदार माघारी येतील, अशी चर्चा होती. मात्र, आता शिंदे गटाकडून ठाकरे गटाचे नव्याने निवडून आलेले खासदारच फोडण्याची तयारी सुरु झाल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात नवा भूकंप होणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी मात्र हा दावा फेटाळला आहे. अपघाताने खासदार झालेल्या नरेश म्हस्के यांनी असला थिल्लरपणा करु नये, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली.

## लोकसभेच्या...

पाटील (सांगली - अपक्ष), उदयनराजे भोसले (सातारा - भाजप) व श्रीमंत शाहू महाराज भोसले (कोल्हापूर - काँग्रेस) हे दोन राजघराण्यातील उमेदवार विजयी झाले आहेत.

यापूर्वी लोकसभा निवडणुकीत वकील उमेदवार विजयी होण्याचे प्रमाण जास्त होते. यंदा मात्र फक्त एकच वकील उमेदवार महाराष्ट्रातून केंद्रात गेला आहे. राज्यात ॲड. गोवाल पाडवी (नंदुरबार - काँग्रेस) हे एकमेव वकील विजयी झाले आहेत. तर सुप्रसिद्ध वकील ॲड. उज्ज्वल निकम (उत्तर मध्य मुंबई), वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर (अकोला) व ॲड. सुनील गोंदण (उत्तर मुंबई) या तीन प्रमुख वकील उमेदवारांचा पराभव झाला आहे.

## देशात सॅटेलाईट...

अशा प्रकारची माहिती निवेदनात दिली आहे.

वाहनधारकांना काय फायदा?

जीएनएसएस-आधारित इलेक्ट्रॉनिक टोल संकलनाची भारतात अंमलबजावणी केल्याने राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची सुरळीत हालचाल सुलभ होईल. तसेच हायवे वापरकर्त्यांना अनेक फायदे मिळतील जसे की अडथळा-कमी फ्री-फ्लो टोलिंग ज्यामुळे त्रास-मुक्त रायडिंग अनुभव आणि अंतर-आधारित टोलिंग जेथे वापरकर्ते फक्त राष्ट्रीय महामार्गावर केलेल्या प्रवासासाठी पैसे देतील, असे त्यात म्हटले आहे. जीएनएसएस-आधारित इलेक्ट्रॉनिक टोल संकलनामुळे अधिक कार्यक्षम टोल संकलन देखील होईल कारण ते गळती बंद करण्यात आणि टोल चुकविणा-यांना तपासण्यात मदत करते.

## राज्यात विजांच्या...

पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर आजपासून पुढील ५ दिवस विदर्भातील सर्व जिल्ह्यांना हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. आगामी काळात विदर्भात सर्वत्र तुरळक ते माध्यम स्वरूपात पावसाच्या सरी कोसळण्याचाही अंदाज आहे.

झाडे कोलमडली, विद्युत खांबांची पडझड

गोंदियात काल शुक्रवारी सायंकाळी आलेल्या वादळी पावसाचा तडाखा शहारवाणी परिसराला बसला आहे. वादळी पावसामुळे अनेक घरांवरील टीन पत्र्याचे छत उडाले. तसेच झाडांची आणि विद्युत खांबांची पडझड झाली. गोंदिया जिल्ह्यातील शहारवाणी परिसरात मंगळवारी सायंकाळी जोरदार वादळी वा-यासह पावसाला सुरुवात झाली. जवळपास १५ ते २० मिनिटे झालेल्या वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यात अनेक मोठी झाडे उन्मळून पडली आहेत, तर अनेक विद्युत खांब पडल्याने विज पुरवठा खंडित झाला आहे. या सोबतच शेतक-यांचेही काही प्रमाणात नुकसान झाल्याने नागरिकांनी आता शासनाकडे मदतीची मागणी केली आहे.

शेतकरी मशागती नंतर लागवडीच्या प्रतीक्षेत

ऐन उन्हाळ्यात जिल्ह्यात मान्सूनपूर्व अवकाळी आणि वादळी पावसाने अनेकदा हजेरी लावली. त्यामुळे जमीन ओलसर असल्याने शेतक-यांना उन्हाळवाईची मशागत करण्यास शेतक-यांना सोपे गेले. मशागतीची कामे आटोपली असून काही भागात तर जोरदार पाऊस झाल्याने शेतक-यांनी लागवडीस सुरुवात केली. ज्या शेतक-यांकडे ओलिताची सोय आहे अशा शेतक-यांनी मान्सूनपूर्व कपाशीची लागवडही केली. शेतक-यांनी बियाणे, खते खरेदी करण्यास सुरुवात केली आहे.

## जागतिक...

करून पर्यावरण दिवस साजरा केला.

जिल्हा क्रीडा संकुल ते स्टीम एज्युकेशन संकुल वर दिंडी आल्याननंतर वृक्षांचा वाढदिवस आणि वृक्षारोपण औसारोड परीसरात करण्यात आले. यावेळी मा. जिल्हाधिकारी त्यांच्या हस्ते एक बकुळीचे चे झाड या परिसरात लावण्यात आले. आणि हा वृक्ष जतन करण्यासाठी औसा रोड येथील जॉकी शोरूमने दत्तक पण घेतला.

दिंडीच्या सांगता समारंभात प्रास्ताविक करताना सुपर्ण जगताप म्हणाले की आई आणि झाड यांच्या पेक्षा मोठे जगात कोणीही नाही. आपण कायम या दोघांच्या ऋणात राहिला हवे. यावेळी माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी निसर्ग संवर्धन करावे , तसेच वृक्ष निसर्ग वाचवण्याचे आवाहन करणाऱ्या लहान चिमुकल्याचे या कलापथकाची खूप खूप कौतुक केले आणि आजचा दिना पर्यावरण संवर्धनाचा हा संदेश माझ्या मनाला खूप भावला . आपण सर्वजण मिळून आज पर्यावरण दिनानिमित्त एक शपध घेऊया प्रत्येकाने लातूर जिल्ह्याचा नागरिक म्हणून निसर्ग संवर्धनाचे आपले कर्तव्य पार पाडूया. तसेच आपल्या स्थानिक प्रजातीच्या वृक्षांची लागवड करून जगवूया. मुख्य रस्त्यापासून आपल्या गावापर्यंत जाणाऱ्या वाटेवर हरित अच्छादन असलेले वृक्षमय रस्ते आपणास तयार करायचे आहेत. प्रत्येक नागरिकांनी या कार्यामध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी ओमप्रकाश झुरळे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले . आजच्या या उपक्रमात वॉक फॉर क्लायमेट चेंज, तसेच लातूर शहरातील झाडांचा आठवा वाढदिवस, जिल्हा क्रीडा संकुल येथे वृक्षारोपण तसेच औसा रोड येथे वृक्षारोपण, वृक्षदिंडी विविध नागरिकांनी, चिमुकल्यांनी वातावरणातील बदलाला कसे सामोरे जायचे याचे आवाहन करणारे फलक हातात धरून खूप मौलाचा संदेश दिला यानंतर संध्याकाळी महाविद्यालयीन तरुण-तरुणी सोबत पर्यावरण विषयक पुस्तकांचे वाचन वाचन कट्ट्यावर घेण्यात येणार आहे

लातूर च्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे यांनी सहभागी सर्व संस्थांचे नागरीकांचे खास करून सिने अभिनेते सयाजी शिंदे यांचे, सह्याद्री देवराई ,लातूर शहर मनपा, स्टीम एज्युकेशन, वर्शीप अर्थ फाउंडेशन, लातूर वृक्ष चळवळ ,मलाबार गोल्ड, खाकी फाउंडेशन , आम्ही मावळे शिवबाचे यांचे या उपक्रमाबद्दल खूप खूप कौतुक करत अभिनंदन केले.


**DECLARATION**
**CHANGE OF NAME.**

I have changed my name from AAYESHA BEGAM ABDULLAH SHAIKH to AYESHA BEGAM ABDULLAH SHAIKH Hence for this declaration. And in future I will use my new name AYESHA BEGAM ABDULLAH SHAIKH. Also, in future the same name will be used by my family.

**OLD NAME**
AAYESHA BEGAM ABDULLAH SHAIKH
**NEW NAME**
AYESHA BEGAM ABDULLAH SHAIKH
**ADDRESS**
GALLI NO 1, CHAUDHARI NAGAR,
Latur,413512, Maharashtra, INDIA

**टी.सी. हरवले आहे**

शेळके विजयकुमार छगनराव या नावाची दयानंद कॉलेज ऑफ ची प्रथम वर्षाची जी कि दि.०७/०४/२०२४ रोजी शिवाजी चौक ते औसा रोड दरम्यान प्रवासादरम्यान प्रवास करीत असताना मुळ कागदपत्र, टी.सी. हरवलेली आहे. कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**मोबा-९०११११५५७००**

**जाहीरनामा**

कोर्टाचा शिक्का

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**चाकूर, यांचे कार्यालय**
(दंडणीय विभाग)

जा.क. २०२४/एमएजी/कावि दि.२७/५/२०२४
अर्जदार :- गायकवाड बाबासाहेब बळीराम
विरूध्द
गैरअर्जदार मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, नायगाव
अर्ज :- कलम १३(३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. गायकवाड बाबासाहेब बळीराम रा. नायगाव ता. चाकुर जि. लातूर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा मुलगा कु. गायकवाड अमित बाबासाहेब चा जन्म दि. २७/०३/२०११ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय नायगाव ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय नायगाव ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि.२७/५/ २०२४ पुढील तारीख २८/६/२०२४

**आदेशावरून**
**तालुका दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार, तहसील कार्यालय,**
**चाकुर**

**जाहीरनामा**

कोर्टाचा शिक्का

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**चाकूर, यांचे कार्यालय**
(दंडणीय विभाग)

जा.क. २०२४/एमएजी/कावि दि.२७/५/२०२४
अर्जदार गायकवाड बाबासाहेब बळीराम
विरुध्द
**गैरअर्जदार:**-मुख्याधिकारी नगर पंचायत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, नायगाव
**अर्ज :-** कलम १३(३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा,

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. गायकवाड बाबासाहेब बळीराम रा. नायगाव ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा मुलगा कु. गायकवाड आशिष बाबासाहेब चा जन्म दि.०६/०१/२००९ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय नायगाव ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय नायगाव ता. चाकुर जि. लातूर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य ती आदेश पारीत करेल मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि.२७/५/२०२४ पुढील तारीख २८/०६/२०२४

**आदेशावरून**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

**पाहिजेत**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित

**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर**

**(थेट मुलाखत)**

आमच्या वरिष्ठ महाविद्यातील सन 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठी घड्याळी तासिका तत्त्वावर अधिव्याख्यात्यांची तात्पुरत्या स्वरुपात मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांचे पत्र क्र. विशिससं/उशि/नांवि/अनु-2/घ.ता./2023-24/922, दि. 05/04/2024 नुसार खालील प्रमाणे रिक्त पदे भरावयाची आहेत.

**वरिष्ठ महाविद्यालय पदवी अनुदानित (सहाय्यक प्राध्यापक)**

| अ.क्र | विषय | पद संख्या | अ.क्र | विषय | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इंग्रजी | 3 | 11 | वाणिज्य | 2 |
| 2 | मराठी | 3 | 12 | रसायनशास्त्र | 5 |
| 3 | हिंदी | 2 | 13 | भौतिकशास्त्र | 4 |
| 4 | समाजशास्त्र | 3 | 14 | इलेक्ट्रॉनिक्स | 5 |
| 5 | इतिहास | 1 | 15 | गणित | 2 |
| 6 | लोकप्रशासन | 3 | 16 | वनस्पतीशास्त्र | 4 |
| 7 | राज्यशास्त्र | 1 | 17 | प्राणिशास्त्र | 4 |
| 8 | अर्थशास्त्र | 2 | 18 | दुग्धशास्त्र | 4 |
| 9 | भूगोल | 5 | 19 | संगणकशास्त्र | 2 |
| 10 | तत्त्वज्ञान | 1 | **एकूण** | | **56** |

(1) युजीसी व म. शा. नि. सं-2018/(185/18)/मशि-3 दि.14/11/2018 नुसार ठरवून दिलेल्या शैक्षणिक पात्रता अधिन राहून असतील. (2) म.शा.नि.स.-2018/(185/18)/मशि-3 दि.14/11/2018 नुसार वेतन व मानधन शासनाकडून आर्थिक तरतूद झाल्यानंतर मान्य होईल. (3) नेट/सेट/पीएच.डी. उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनीच अर्ज व शैक्षणिक कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित राहावे. (4) मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना प्रवास / दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

मुलाखत दिनांक : **16/06/2024 (रविवार)** वेळ **स. 10 वा.**

नाव नोंदणी : **स. 08 ते 10 पर्यंत,** **स्थळ : कार्यालय, म. ब. महा., लातूर**

**अध्यक्ष/सचिव** — श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर
**प्रभारी प्राचार्य** — महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क **99 93 94 16 69** **98 98 20 38 88**

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क **99 75 47 98 26**

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत उदगीर

रविवार दि. ९ जून २०२४

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## मल्लिकार्जुन मानकर यांचे वाढदिवसानिमित्य देवणी येथे सर्व रोग निदान व रक्तदान शिबिर संपन्न



देवणी: प्रतिनिधी - येथील ज्येष्ठ उद्योजक प्रदेश काँग्रेस कमिटीचे मल्लिकार्जुन मानकरी यांच्या वाढदिवसानिमित्त देवणी येथे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

सर्वप्रथम सकाळी श्री ग्रामदैवत महादेव मंदिर व शिवयोगी श्री गुरुलिंगेश्र्वर विरक्त मठामध्ये रुद्राभिषेक कार्यक्रम संपन्न झाले. यानंतर सकाळी दहा वाजता ग्रामीण रुग्णालय देवणी येथील रुग्णांना फळे वाटप करण्यात आले .यानंतर गरीब गरजवंत महिलांना साड्या वाटप करण्यात आले.

याप्रसंगी विविध शासकीय कार्यालयात व मठात वृक्षारोपण करण्यात आले. सर्व रोग निदान शिबिराचे १८३ रुग्णांची तपासणी करण्यात आली ,३८६ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तर ६० रुग्णावर नेत्र शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

तर या रक्तदान शिबिरामध्ये ११३ जणांनी रक्तदान केले .नागप्पा अंबरखाने ब्लड बँकेने हे रक्त संकलन केले.

शहरातील सर्व कार्यक्रम म.नि.प्र. प्रसिद्धलिंग महास्वामीजी यांच्या सानिध्यामध्ये संपन्न झाले.

या कार्यक्रमास वाढदिवस संयोजन समिती पदाधिकारी ,नेते कार्यकर्ते बहुसंख्याने उपस्थित होते.



## जे जे फाउंडेशन कडून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कौळखेड येथे वृक्षरोपण

उदगीर / प्रतिनिधी- आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कवळखेड गावामध्ये श्री संगमेश्र्वर देवस्थान परिसरात जेजे फाउंडेशन कौळखेड (जगतज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था) मार्फत चिंच, सिताफळ, करंजी, लिंब, अशा वेगवेगळ्या प्रकारचे वृक्षरोपण करण्यात आले. यावेळेस जे जे फाउंडेशनचे अध्यक्ष. प्रेमसागर बिरादार कवळखेडकर, सहसचिव. विशाल स्वामी उदगीरकर, ओमकार भंगुरे, श्यामा पवार, समर्थ भंगुरे, स्वरूप पुणे, अभिषेक स्वामी, सुमित लाल, आदित्य पाटील, वैष्णवी वाघमारे, अश्विनी दळवे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## सैनिकी विद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण संपन्न



उदगीर / प्रतिनिधी- श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात जागतिक पर्यावरण दिन' या निमित्ताने विद्यालयाचे प्राचार्य व्ही. जी . कुलकर्णी यांनी वृक्षारोपण केले. यावेळी त्यांच्या सोबत सहशिक्षक उमाकांत नादरगे, संतोष चामले, मैनोद्दीन सय्यद व शंकर चितळे उपस्थित होते.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सैनिकी विद्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. प्राचार्य वसंत कुलकर्णी यांनी पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे, असा संदेश दिला.

पूढे बोलताना प्राचार्य वसंत कुलकर्णी म्हणाले, वृक्षाचे लागवड करुन त्याची जोपासना करणे आज गरजेचे आहे. वातावरणातील तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. हे कमी करण्यासाठी वृक्षांचे संवर्धन व संगोपन आवश्यक आहे . वृक्षारोपण व स्वच्छता मोहिम यासाठी उपस्थित सर्वांचे आभार इतिहास विषयाचे सहशिक्षक उमाकांत नादरगे यांनी मानले.

## साने गुरुजी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी धनंजय गुडसूरकर

उदगीर /प्रतिनिधी - साने गुरुजीच्या १२५ व्या जन्म वर्षाचे औचित्य साधून पंढरपूर येथे होणाऱ्या साने गुरुजी विचार संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक धनंजय गुडसूरकर यांची निवड झाली आहे . श्रीक्षेत्र पंढरपूर येथे सोमवारी १० जूनला हे संमेलन होणार आहे .

मातोश्री कै. विमल चौंडावार यांच्या दहाव्या स्मृतिदिनाच्यानिमिताने महाराष्ट्र माऊली साने गुरुजी विचार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती या संमेलनाचे आयोजक संतोष चौंडावार यांनी दिली . या संमेलनाचे उद्घाटन पंढरपूरच्या माजी नगराध्यक्ष साधनाताई भोसले यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहूणे म्हणून ह.भ.प . विनय महाराज आपटे, संत साहित्याच्या अभ्यासक नसिमा पठाण, श्यामराव पाटोळे व अशोक शर्मा हे उपस्थित राहणार आहेत . उदघाटन सत्रानंतर आई : श्यामची व आजची हा परिसंवाद होणार असून डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांच्यासह सौ. शशिकला गुंजाळ, सविता कुरुंदवाडे हे सहभागी होणार असून अन्य सत्रात काव्यप्रेमी शिक्षक मंचचे अध्यक्ष आनंद घोडके राजेंद्र उगले, सौ. वैशाली सुर्यवंशी, सौ . उज्वला शिंदे, सौ . संध्या धर्माधिकारी, सौ . उज्वला शिंदे, सौ. वंदना कुलकर्णी, छाया उंब्रजकर, कविता हिंगमर प्रिया कौलवार, अश्र्लेषा मोदी, विणा व्होरा, स्वाती गांधी, पूजा पांडे, श्याम ठाणेदार, रमेश वाघ, किशोर जाधव, ड. दिलीप कांबळे, रमेश वाघ, किशोर जाधव, नवनाथ शिंदे, महेश कोळेकर, गिरीश दुनाखे हे साहित्यिक सहभागी होणार आहेत . पंढरपूर येथील राऊळ महाराज मठात हे संमेलन होणार असल्याचे संयोजन समितीचे रामचंद्र सरवदे यांनी सांगितले .

या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेले धनंजय गुडसूरकर हे नामांकित लेखक असून त्यांची पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. महाराष्ट्रातील नामवंत नियतकालिकांतून त्यांचे लिखाण प्रसिद्ध असून सातत्यपूर्ण लेखन करणाऱ्या गुडसूरकर यांचा बालसाहित्य, ललित लेखन, समीक्षा लेखन या प्रांतात वावर आहे. श्रमर्षी बाबा आमटे यांच्या कार्यावर १२५ व्याख्याने देणाऱ्या गुडसूरकर यांचे साहित्य चळवळीत मोठे योगदान आहे. उदगीर येथील प्रबोधन साहित्य परिषदेचे ते संस्थापक अध्यक्ष असून या माध्यमातून ३० वर्षात त्यांनी साहित्यिक उपक्रम राबविले असून शिक्षक विद्यार्थ्यांना लिहिते करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. कथाकथन, एकपात्री प्रयोग यामधून त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. ३९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे कार्यवाह राहिलेल्या गुडसूरकर यांचे ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनात ही योगदान राहिले आहे . महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ते सदस्य आहेत . माहूर येथे झालेल्या विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे व शिरूर अनंतपाळ येथे झालेल्या विभागीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष राहिले आहेत .

## समर्पणनचे राष्ट्रीय नीट परीक्षेत यश

उदगीर / प्रतिनिधी - येथिल विद्यार्थ्यांमध्ये जिद्द आत्मविश्र्वास आणि अथक परिश्रमाचे बीज पेरनाऱ्या समर्पण करिअर इन्स्टिट्यूटने बोर्ड पाठोपाठ राष्ट्रीय पातळीवरील वैद्यकीय प्रवेश परीक्षा छएएढ मध्ये यशाचे उंच शिखर गाठून आपल्या उदगीरचा समर्पण पॅटर्न तयार केला आहे. हा पॅटर्न तयार करून समर्पण करिअर इन्स्टिट्यूट उदगीरच्या विद्यार्थ्यांची पहिली पसंद ठरत आहे. फक्त सात विद्यार्थ्यांची बॅच घेवून त्यापैकी चार विद्यार्थी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस प्रवेशास व दोन विद्यार्थी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बीएएमएस प्रवेशास पात्र झाले आहेत. त्यापैकी अनुराग विठ्ठलराव भोसले या विद्यार्थ्याने ६२५ गुण घेवून उदगीर तालुक्यामधुन प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. आरक्षित प्रवर्गातुन गायत्री कांबळे ५५३ गुण, अविनाश सुवर्णकार ५३४ गुण तर रितेश तुंकलवाड ४४४ गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे.

नीट परीक्षा म्हटलं की विद्यार्थी लातूर, नांदेड, हैदराबाद, कोटा अशा ठिकाणी जाऊन या परीक्षेची तयारी करतात परंतु आपल्या उदगीरचं आपलं ब्रँड असलेल्या समर्पण करिअर इन्स्टिट्यूटने सिद्ध करून दाखवलं की पुर्णवेळ उदगीर मध्ये राहून या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेतून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवता येतो. या यशाबद्दल समर्पण करिअर इन्स्टिट्यूट उदगीरचे कौतुक व अभिनंदन मा. नगराध्यक्ष राजेश्र्वरजी निटुरे, ग्राम विकास मंत्रालयाचे कक्ष अधिकारी मा.अच्युत इप्पर, नाशिकचे अप्पर पोलीस अधीक्षक मा. अनिकेत भारती, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, डॉ. नामदेव नरवाडे यांनी केले आहे.

या यशासाठी समर्पण करिअर इन्स्टिट्यूट उदगीरचे संचालक प्रा. अविनाश पाटील, प्रा. सुनिल ढगे, प्रा. पांडुरंग फड, प्रा. विकास पाटील, प्रा. राधाकिशन जाधव, प्रा. पवन नलाबले, प्रा. श्रीदेवी पाटील व सर्व समर्पण टीम ने अथक परिश्रम घेतले आहे.

## तालमणी हारुताई सुतार यांनी तबलावादनाने मिळवल्या उदगीरकरांच्या अमाप टाळ्या



उदगीर (प्रतिनिधी) : शिव संप्रदायातील पहिल्या महिला मृदंगाचार्य म्हणून निटूर (ता. निलंगा) येथील रहिवासी हारुताई सुतार यांचा महाराष्ट्रासह शेजारील राज्यांतही लौकिक आहे. त्यांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने उदगीरकर रसिकांना नुकतेच भाव-विभोर करुन सोडले आणि महिलादेखील वादन कलेत तरबेज असल्याचे दाखवून दिले. डॉ. शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली उदगीर येथे नुकत्याच पार पडलेल्या श्री. हावगीस्वामी मठाच्या कलशारोहण सोहळ्यानिमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांनी सलग आठ दिवस आपल्या कौशल्यपूर्ण तबला वादनाने रंगत आणून उदगीरकर रसिकांच्या अमाप टाळ्या मिळवल्या.

हारुताई उर्फ दैवशाला सुतार यांना शैलीपूर्ण तबला वादनाची अविट गोडी लहानपणापासूनच असून त्यांचे शास्त्रीय संगीतामध्ये तबला विशारद, गायन विशारद झाले आहे. त्यांना वेगवेगळ्या प्रकारांतील वादन करायला त्यांच्या कीर्तनकार मातोश्री शि. भ. प. कमळाबाई व हार्मो नियम वादक वडील हावगीराव सुतार यांनी प्रोत्साहन दिले. तबलावादक हारुताई सुतार यांनी जोपासलेल्या या कलेतील प्रवास उल्लेखनीय आहे. रोज सराव करणे हा त्यांचा नित्यक्रम असून त्या पारंपरिक वादनासह गायन देखील नजाकतीने पेश करतात. सोडू नको जयघोष या शिवनामाचा.., तूच माझी माता, तूच माझा पिता.., टाळ मृदुंगाचा आवाज गगनी धडकला.., दिंडीला चला हो, दिंडीला चला.. ही त्यांची स्वरचित, स्वतः स्वरबद्ध केलेली सुमधुर गाणी अल्पावधीतच लोकप्रिय ठरली आहेत.

उदगीरमध्ये सलग आठ दिवस त्यांनी आपली गायन आणि वादन कला सादर करून उदगीरच्या रसिकांची मने जिंकली, प्रेक्षकांकडून प्रशंसा मिळवली. उदगीर शहरातील कार्यक्रमादरम्यान त्यांनी तबला वाजवण्यासाठी अंगीकारलेली शरीराची सुस्थिती, प्रसन्न भावमुद्रा, अक्षरांमधील कमालीची स्पष्टता, सहजसुंदर व संयमित वादन, त्यासाठीची पूर्वतयारी आणि त्यांच्या ठायी असणारा आत्मविश्र्वास या महत्त्वाच्या गोष्टी उदगीरच्या रसिकांनी चर्चेत आणल्या आणि उदगीर पंचक्रोशीतील रसिकांनी त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मार्गदर्शक गुरु अमर कडतने, रविराज किडीले, प्राचार्य बशीर शेख, श्र्वेता पाटील यांचा त्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे.

मृदंग वादनासह ढोल-ताशा वाजवण्यातही त्यांचा हातखंडा आहे. त्या शेती कामातही मुरलेल्या आहेत. तसेच खेळातही त्यांनी आपली विशेष चमक दाखवत यावर्षीच्या महिला दिनानिमित्त आयोजित महिला क्रिकेट स्पर्धेत त्या 'मॅन ऑफ द मॅच'च्या मानकरी ठरल्या आहेत. त्यांनी केलेल्या गायन व संगीत क्षेत्रातील सेवेबद्दल सांप्रत वर्षी त्यांना 'तालमणी' हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान त्यांना आष्टी (लक्ष्मणाची) येथील श्री. सिद्धेश्र्वर, मोरंगे स्वामी मठ संस्थानचे विश्र्वचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते समारंभपूर्वक देण्यात आला.

अखंड शिवनाम सप्ताहनंतर घेतलेल्या विशेष मुलाखतीत आमचे प्रतिनिधी शिवाप्पा पाटील यांच्याशी मुक्त संवाद साधताना त्यांनी सांगितले की, मार्गदर्शनाचे हात पाठीवर असले की कला जोपासण्यासाठी योग्य दिशा मिळते. माझे आईवडील, मार्गदर्शक गुरु यांनी मला या क्षेत्रात मोठे केले. गुरूंचा विश्र्वास सार्थ करत मला एक कलाकार म्हणून साता समुद्रापार झेंडा फडकवायचा आहे, तबलावादक म्हणून मोठे विक्रम मोडायचा मनसुबा असल्याचेही त्या म्हणाल्या. या मुलाखती दरम्यान आपल्या भावना पुढे व्यक्त करताना हारुताई सुतार म्हणाल्या की, रसिकांनी भरपूर दिलेली दाद प्रेरणा देते. तबला वादन हे काही शिक्षण नसून ती एक प्रयत्नसाध्य कला आहे, साधना आहे. या कलेशिवाय, साधनेशिवाय मी जगू शकत नाही. ही कला माझा श्र्वास आहे. हा अभिजात ठेवा जतन करणे आपले कर्तव्य आहे, अशीही भावना त्यांनी पत्रकार शिवाप्पा पाटील यांच्याशी बोलताना व्यक्त केली.


CBSE Affiliation No. 1131357

**ADMISSIONS OPEN**

CBSE Class : NUR to X

**FOUNDATION CLASSES FROM 6 TO 10**

**BUMPER DISCOUNT ON TRANSPORTATION**





| Distance | Regular Charges | Discount before 20 June 2024 | Discount before 31 June 2024 |
|---|---|---|---|
| Up to 2 Km | 13,000 | 7,000 | 4,000 |
| Above 2 Km | 15,000 | 7,000 | 4,000 |


Computer Lab


Language Lab (Phonetics)


Science Lab


Maths Lab


Robotics Lab


Music Room

**G. K. International School**

Shellhal Road, Udgir 9503750007 / 9168050007